# डॉ. नितीन मोरे

# चक्रमादित्याचा दरबार



# चक्रमादित्याचा दरबार

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# चक्रमादित्याचा दरबार

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २६ जुलै २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना**

आपल्या देशात लोकशाही तशी रूजली आहे. दर पाच वर्षांनी याचा प्रत्यय आपण घेतोच. काही असले तरी पाच वर्षांसाठी तरी का होईना आपला राजा आपण निवडतो. म्हणजे लोकशाहीत ही राजेशाहीची बीजे अजून आहेतच. सत्ताधारी कोणत्याही पक्षाचा असो, आपापले राज्य गाजवून जातो.

आपला अधिकार गाजवायला त्याला आवडतेच. त्यातून कित्येक विसंगती जन्मल्या तरी त्याबद्दल त्याला काही वाटण्याची गरज नसते. यातूनच जन्माला येतो तो राजा चक्रमादित्य आणि त्याचा हा दरबार ! बाकी काही असले तरी दरबार हा भरतोच आणि कामकाज हे चालतेच.

अशा ह्या चक्रमपुरातील चक्रमादित्याच्या दरबारातील या कथा.

अगदी अशी बजबजपुरी अजून नसली तरी यातील कित्येक वैशिष्ट्ये आपल्याकडे आहेत. त्यातील काही या गमतीजमती ! तशा गमती म्हटले तरी आपल्यासारख्या सामान्यांसाठी गंभीरच. पण गंमत म्हणा की गंभीर, वस्तुस्थिती आहे तशीच राहते. त्यामुळे काही हसण्यावारी नेण्याव्यतिरिक्त आपण काय करू शकतो?

महाराज चक्रमादित्यांचा हा दरबार वाचकांच्या पसंतीस पडेल अशी आशा आहे.

**डॉ. नितीन मोरे**

अर्पण पत्रिका

वर्षानुवर्ष आपल्याच चक्रमादित्याचा कारभार मूकपणे पाहणाऱ्या तमाम जनतेस

हे “नाटक” सादर अर्पण

--नितीन मोरे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo. com

या सर्व नाटिका, व त्यातील व्यक्ती, नावे, पात्रे, पत्रे, योजना  काल्पनिक आहेत आणि यांचा कोणाही जीवित वा मृत राजे, संस्थाचालक, मालक, सोसायट्यांचे पदाधिकारी, राजकीय पुढारी, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था, त्यांचा कारभार वगैरेंशी साम्य आढळल्यास कुणाकडे बोलू नका.

योगायोग काय!

होतातच!

# चक्रमादित्याचा दरबार १

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. त्यांच्या हातात एक ( बोगनवेलीचे ! ) फूल. ते नाकाजवळ घेऊन जात महाराज म्हणतात,

महाराज : प्रधांजी, काय हाल हवाल आहे राज्याची?

प्रधानजी : महाराजांच्या कृपेने सर्व काही उत्तम चालू आहे महाराज.

महाराज : आज आम्ही खूप खूश आहोत. आपल्या सारखे प्रधांजी आहेत म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you, महाराज

महाराज : आणखी काही प्रधांजी?

प्रधानजी : महाराज सर्वत्र अगदी आलबेल आहे. मुलं लहान असताना जन्मत आहेत. म्हातारी झाल्यावर माणसे मरत आहेत. मोठी मुलं शाळेत जाताहेत आणि तरूणपणी त्यांची लग्नं होताहेत.

महाराज : प्रधांजी, नक्की काय ते सांगा

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. राज्यातील ५० टक्के जनता खाऊन पिऊन सुखी आहे. त्या ५० टक्के लोकांना दोन वेळचे खायला मिळत आहे आणि त्यातच ते सुखी आहेत. राज्यात कित्येक ठिकाणे अशी आहेत की जिथे दंगली झालेल्या नाहीत. काही ठिकाणी दरोडे अजूनही पडलेले नाहीत. तसेच काही ठिकाणी खून व चोऱ्याही झालेल्या नाहीत. आपल्या मंत्रीमंडळात अजूनही ४० पैकी ५ मंत्री असे आहेत की ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झालेले नाहीत. .

महाराज : आज आम्ही खूप खूश आहोत. आपल्या सारखे प्रधांजी आहेत म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : प्रधांजी, महागाई बद्दल आमच्या कानी काही आले होते.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण आपली कीर्ती जशी त्रिखंडात वाढते आहे त्याच वेगात महागाई वाढते आहे. आणि महागाईचा वाढणे हा धर्मच आहे. आणि आपल्या राज्यात धर्माचारणाशिवाय तिला दुसरा पर्यायच नाही.

महाराज : प्रधांजी, काल आमच्या जेवणात २ बदाम आणि ३ काजू कमी होते हे आमच्या नजरेस आले आहे त्या बद्द्ल जाब द्यावाच लागेल तुम्हाला.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. आपल्या चाणाक्ष नजरेतून हे सुटणार नाही हे माहितीच होते. महागाईमुळे सुक्यामेव्याच्या आयातीवर परिणाम झाला आहे. आम्ही ह्या प्रकरणाची चौकशी केली आहे. त्यात २ बदाम आणि ३ काजूंच्या सरकारी खजिन्याच्या अपहारा बद्दल मुदपाक खान्यातील खानसामा, त्याच्या हाताखालचे सेवक आणि इतर १५ जणांना कैदेत टाकण्यात आले आहे.

महाराज : कैदेत का? तोफेच्या तोंडी द्या सर्वांना.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण तोफेच्या तोंडी द्यायला पण मोठी वेटिंग लिस्ट आहे.

महाराज : असू देत तोफेच्या तोंडी जाण्यासाठी वाट पाहणाऱ्या सर्वांना आमचा हुकूम आहे त्यांचा नंबर आल्याशिवाय त्यांना तोफेच्या तोंडी देण्यात येणार नाही. सर्वांना सांगा की सब्र का फल मीठा होता है.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : पण आमच्या काजू बदामांचे काय?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण आपल्या अन्नमंत्र्यांनी तातडीने आखाती देशातून काजू बदामांची आणखी आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थ

मंत्रालयाने वाढत्या महागाईची गंभीर दखल घेतली आहे. वाढत्या महागाईमुळे महाराजांना त्रास होऊ नये म्हणून जनतेवर महागाई कर बसवण्याचा निर्णय घेतला आहे. आपली जनता ही महाराजांना तोशिस पडू नये म्हणून हा भार आनंदाने सोसायला तयार आहे. महागाई करा मुळे महागाई अधिकच वाढेल आणि चक्रवाढ पद्धतीने परत कर वाढेल अशी ही योजना आहे. त्यामुळे महाराजांना यावच्चंद्रदिवाकरौ महागाईने त्रस्त व्हावे लागणार नाही.

महाराज : आज आम्ही खूप खूश आहोत. आम्हाला तुमचा अभिमान वाटतो. आपल्या सारखे प्रधांजी आहेत म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you, महाराज.

महाराज : प्रधांजी, आपल्या क्रीडा मंत्र्यांवर  भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते त्याची चौकशी पूर्ण झाली काय?

प्रधानजी : जी महाराज, क्रीडा मंत्री आपल्या मंत्रालयात वेगळीच क्रीडा करताना पकडले गेले. त्याशिवाय त्यांनी लाच ही घेतली असे सिद्ध झाले आहे. याविरूद्ध अत्यंत कडक कारवाई झालेली आहे. ज्या पहारेकरी शिपायाने सर्व संबंधितांना मंत्रीमहोदयांकडे पाठवले तो आणि ज्याने हा सर्व व्यवहार पाहिला त्या इसमास भ्रष्टाचाराला उत्तेजन दिल्याबद्दल कैदेत टाकण्यात आले आहे महाराज.

महाराज : कैदेत का? तोफेच्या तोंडी द्या सर्वांना. आमच्या राज्यात एकही गुन्हेगार सुटता नये.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : प्रधांजी, आपल्या सुरक्षा आघाडीची काय खबरबात आहे?

प्रधानजी : सर्व काही आलबेल आहे महाराज. आपले सैनिक डोळयात तेल घालून आपल्या सुरक्षेची काळजी घेत आहेत. सीमेवरून काही फौज परत बॉलावून आपल्या महालात कीडा मुंगीलाही शिरकाव करता येणार नाही असा कडेकॉट बंदोबस्त केलेला आहे महाराज.

इतक्यात एक माशी उडत उडत येऊन महाराजांच्या हातातील फुलावर बसते. महाराज संतप्त होतात.

महाराज : प्रधांजी, हीच काय ती सुरक्षा व्यवस्था? कोणी येऊ दिले या माशीस आमच्या महालात त्या पहाऱ्यावरील शिपायांचा ताबडतोब शिरच्छेद करा आणि आपल्या अंतर्गत सुरक्षामंत्र्यांना तोफेच्या तोंडी द्या.

शिपाई येऊन मंत्र्यांना पकडून नेतात.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. हुकुमाची तामीली होईल महाराज. आताच्या आता त्या गुन्हेगार माशीस पकडण्यात येईल महाराज.

काहीच क्षणांत दोन शिपाई एका तबकात मेलेली माशी घेऊन येतात.

प्रधानजी : महाराज हीच ती आगाऊ माशी जिने आपल्या महालात येण्याचा प्रमाद केला.

महाराज : तोफेच्या तोंडी द्या या माशीला.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण ही माशी अगोदरच मेलेली आहे.

महाराज : प्रधांजी, सुरक्षामंत्र्यांना बोलावा, आम्ही त्यांच्या ह्या prompt action वर खूश आहोत, त्यांना बढती द्या.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण आपणच त्यांना तोफेच्या तोंडी द्यायचे आदेश दिले आहेत.

महाराज : प्रधांजी, ठीक आहे अजून वेटींग मध्ये असतील ते. परत बोलवा त्यांना.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : प्रधांजी, आज आम्ही गेल्या अर्ध्यातासापासून राज्यकारभार पाहून शिणून गेलो आहोत.

प्रधानजी : आम्हाला त्याची कल्पना आहे महाराज. आपल्या सांस्कृतिक मंत्रालयाने म्हणूनच आपल्या मनोरंजनाची सोय शेजारच्या आरशेमहालात केली आहे. त्यानंतर अन्न मंत्रालयानी भोजन व पेय पानाची व्यवस्था त्या शेजारील महालात केली आहे.

महाराज : आज आम्ही खूप खूश आहॊत. आम्हाला तुमचा अभिमान वाटतो. आपल्या सारखे प्रधांजी आहेत म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहॊत’

प्रधानजी : thank you महाराज

महाराज : दरबार बरखास्त.

सर्व दरबारी : महाराजांचा विजय असो.

(२)

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. महाराज पेंगुळलेले दिसतात. त्यामुळे हातात फूल पण नाही. महाराज अर्धवट झोपेत आहेत हे सर्वांना जाणवते. तेव्हढ्यात सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणतात,

’कालचा ढोलकीच्या तालावर कसा. . . . ’

महाराज एकाएकी खडबडून जागे होतात.

महाराज : खामॊश ! प्रधांजी, हा कोणाचा आवाज आहे? आमच्या दरबारात फक्त आम्ही आणि आमचे प्रधांजीच बोलतात हे माहित नाही कोणाला?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज, पण दोन दिवसांपासून आम्हालाच सर्दी झाल्याने आमचा आवाजच बदलून गेला आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री प्रधांजींचे जावई असतात त्यामुळे त्यांना तोफेच्या तोंडात जाण्यापासून वाचवायला हा एकच उपाय असतो.

महाराज : ठीक आहे प्रधांजी, काही दवादारू करता की नाही?

प्रधानजी : जी महाराज. दोन्ही करतोय महाराज.

महाराज : प्रधांजी, आज आम्ही खूपच शिणलो आहोत त्यामुळे आज फक्त राज्यकारभाराची जेव्हढी महत्त्वाची कामे असतील तेव्हढीच केली जातील.

प्रधानजी : जो हुकूम महाराज

महाराज : प्रधांजी, करा सुरू

प्रधांजी : जी महाराज.

महाराज : प्रधांजी, काय हाल हवाल आहे राज्याची?

प्रधानजी : महाराजांच्या कृपेने सर्व काही उत्तम चालू आहे महाराज.

महाराज : आज आम्ही खुप खूश आहॊत. आपल्या सारखे प्रधांजी आहेत म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहॊत.

प्रधानजी : thank you, महाराज

महाराज : आणखी काही प्रधांजी?

प्रधानजी : महाराज सर्वत्र अगदी आलबेल आहे. मुलं लहान असताना जन्मत आहेत.

महाराज : हे सर्व सोडा प्रधांजी, fast forward करा.

प्रधानजी : जी महाराज, राज्यातील ५० टक्के जनता खाऊन पिऊन सुखी आहे. त्या ५० टक्के लोकांना दोन वेळचे खायला. . .

महाराज : अजून fast forward प्रधांजी

प्रधानजी : जी महाराज,

महाराज : प्रधांजी, राज्याच्या विविध मंत्र्यांची काय प्रगती त्याचे एकदाचे अहवाल आज सादर करून टाका.

प्रधानजी : जी महाराज, आपल्या कित्येक मंत्र्यांनी खूपच चांगली कामगिरी करून दाखवली आहे. मुख्य म्हणजे आपल्या अर्थमंत्र्यांनी लागू केलेल्या महागाई करामुळे तिजोरीत खूपच भर पडते आहे. अर्थमंत्र्यांच्या ह्या करामुळे महाराज राज्याच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे त्यामुळे महाराजांच्या आदेशानुसार मंत्रिमंडळाचा भत्ता वाढविण्यात आलेला आहे. त्यामुळ्र महाराज आपले मंत्रिगण अत्यंत संतुष्ट आहेत. प्रजाजनांस थोडीशी तोशिस पडली तरी ते आनंदाने ती कळ काढत आहेत.

महाराज : खरंय प्रधांजी, यथा राजा तथा प्रजा. राजा खूश तर प्रजा ही खूश.

प्रधानजी : जी महाराज. काल एका माशीने आपल्या दरबारात यायची जुर्रत केली होती त्या प्रमादामुळे आपल्या सुरक्षा मंत्र्यांनी आपल्या सैन्याला राज्यातील सर्व माशांचा नायनाट करण्याचे आदेश दिले आहेत. सीमेवरून काही फौजेसही त्यासाठी बोलावण्यात आले आहे. कालपासून १०५९५ माशांचा अंत झाल्याचे कळते

महाराज : प्रधांजी, आम्ही आज खूप खूष आहोत. आम्हाला आता आमच्या सुरक्षेबद्दल चिंताच करायला नको.

प्रधानजी : जी महाराज. आपल्या बांधकाम मंत्र्यांनी जंगल तिथे पायवाट आणि गाव तिथे पक्का रस्ता योजना बनविली आहे महाराज. त्यावर जंगलातील पायवाटांवर दर २० योजनांवर तर गावांतून दर १०योजनांवर पथकर घेण्यात येईल. त्यामुळे महाराज रिकाम्या हातांना काम मिळेल आणि राज्याच्या तिजोरीत भर पडेल.

महाराज : नामी योजना आहे प्रधांजी.

प्रधानजी : thank you महाराज. मंत्र्यांनी रस्ते दोन वर्षांनी बनवण्याचे ठरवले आहेत, त्यासाठी आर्थिक पाठबळासाठी हत्ती, घोडे, उंट यांवर कर आजपासूनच घेतला जाईल.

महाराज : आम्ही यावर खूप खूष आहोत प्रधांजी.

प्रधानजी : thank you महाराज. मंत्र्यांनी मात्र यावरच न थांबता रस्त्यावरून चालण्यावर देखील कर आकारायचे ठरवले आहे.

महाराज : वा ! प्रधांजी, आमचे एक एक मंत्री म्हणजे रत्न आहेत.

प्रधानजी : thank you महाराज. महाराजांना आपल्या राज्यातील कलावंतांबद्दल अत्यंत प्रेम वाटते त्यामुळे ढोलकीच्या तालावरच्या धर्तीवर सांस्कृतिक सप्ताह साजरा करायचे आपल्या सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी ठरवले आहे.

महाराज : प्रधांजी, आम्ही त्यांच्यावर अत्यंत नाराज आहोत.

महाराजांच्या एका आदेशावर सांस्कृतिक कार्यमंत्री तोफेच्या तोंडी जातील अशी भीती वाटून प्रधानजींचे श्वशुर हृदय कळवळते.

महाराज : प्रधांजी, आपले राज्य किती मोठे आहे?

प्रधानजी : पूर्वेला कनकावर्त पश्चिमेस लोहापुर उत्तरेत घोडमैदान आणि दक्षिणेत गजावर्त इथवर महाराज आपले प्रजाजन आपले गुण गातात.

महाराज : एवढ्या मोठ्या राज्यातील काही कलावंतांवर अन्याय झालेला आम्हास कदापि सहन होणार नाही.

चाणाक्ष प्रधानजींना त वरून ताकभात ओळखता येतो किंबहुना म्हणूनच ते प्रधानजी झालेले असतात.

प्रधानजी : आपला हुकूम असावा महाराज, आपल्यासाठी सांस्कृतिक सप्ताहाऐवजी सांस्कृतिक मास साजरा करण्यात येईल अशी तजवीज केली जाईल महाराज. उद्यापासूनच हुकुमची अंमलबजावणी होईल महाराज.

महाराज : शुभकामास देरी नको प्रधांजी. कल करे सो आज कर म्हणतात.

महाराज 'अब करों' म्हणत नाहीत यावर आणि आपला जावई बचावल्याबद्दल प्रधानजी खूष होतात.

प्रधानजी : जो हुकूम महाराज

महाराज : आज आम्ही खूप खूष आहोत प्रधांजी, आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करोंत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : प्रधांजी आज आम्ही खूप शिणलो आहोत. ही राज्यकारभाराची कामे आटोपती घ्या. आम्हास निद्रादेवीची आराधना करावयाची आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. पण महाराज शेजारच्या राज्यातून अजात शत्रू महाराज आपल्या राज्यावर चाल करून येण्याची शक्यता आहे अशी खबर आहे .

सांस्कृतिक कार्यक्रमाचा मूड बिघडल्याने महाराजांचा चेहरा त्रासिक होतो.

महाराज : प्रधांजी, असल्या किरकोळ बाबी आमच्या पर्यंत आणू नका. सेनापतींना आदेश द्या, अजातशत्रूंना बघून घ्या, जे काय द्यायचे घ्यायचे आमच्या पर्यंत येऊ देऊ नका. पुढील महिनाभर आम्ही फार महत्त्वाच्या कामात व्यस्त आहोत.

प्रधानजी : जो हुकूम महाराज, आपल्या हुकूमाची तामिली होईल. आपल्याला तोशिस पडू दिली जाणार नाही. आपल्या राजवाड्या आणि रंगमहालाबाहेर आणखी फौज ठेवण्याचे आम्ही आदेश देत आहोत.

महाराज : प्रधांजी आपण आहात म्हणून आम्ही काही चैन से श्वास घेऊ शकतो आहोत, आम्हाला तुमचा अभिमान वाटतो.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : दरबार बरखास्त

सर्व दरबारी : महाराजांचा विजय असो.

( ३ )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. त्यांच्या हातात एक  फूल. यावेळी ते नकली फूल आहे. त्याच्यावर अत्तराचा फवारा मारलेला. ते नाकाजवळ घेऊन जात महाराज जांभई देतात.

एका महिन्यानंतर दरबार भरलेला आहे, तेव्हा आज कामकाज खूप या विचारानेच महाराजांना शीण आला आहे.

महाराज : प्रधांजी, काय हाल हवाल आहे राज्याची?

प्रधानजी : महाराजांच्या कृपेने सर्व काही उत्तम चालू आहे महाराज.

महाराज : आज आम्ही खूप खूश आहॊत. आपल्या सारखे प्रधांजी आहेत म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहॊत.

प्रधानजी : thank you, महाराज

महाराज : आणखी काही प्रधांजी?

प्रधानजी : महाराज सर्वत्र अगदी आलबेल आहे. मुलं लहान असताना जन्मत आहेत. म्हातारी झाल्यावर माणसे मरत आहेत. मोठी मुलं शाळेत जाताहेत आणि तरूणपणी त्यांची लग्नं होताहेत.

महाराज : प्रधांजी, तेच तेच नको, पुढचं काय ते सांगा

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.

महाराज : ते अजातशत्रूंच्या आक्रमणाचे पुढे काय झाले? आमच्या जिवास तिथे ढोलकीच्या तालावर घोर लागला होता.

प्रधानजी : आपणास काळजी नसावी महाराज. आपल्या सेनापतींनी त्यांचा योग्य बंदोबस्त केला आहे, तोही अजिबात रक्तपात न करता.

महाराज : प्रधांजी, असे काय केलेय सेनापतींनी?

प्रधानजी : महाराज, अजातशत्रूंची ताकद फार मोठी तेव्हा त्यांच्या ताकदीचा अंदाज घेऊन सेनापतींनी आपला दारूगोळा व इतर युद्धसामुग्रीची बचत व्हावी आणि आपल्या प्रजाजनांस त्रास सोसावा लागू नये म्हणून आपल्या संरक्षणाची जबाबदारीच अजातशत्रूंवर सोपविली. त्याबदल्यात आपणास त्यांना फक्त आपल्या महसुलाचा पंचवीस टक्के हिस्सा द्यावयाचा आहे. ग्राम्य भाषेत यास खंडणी म्हणतात पण खरे तर हा प्रोटेक्शन फंड म्हणून आम्ही अर्थ मंत्रालयाकडून मंजूर करविला आहे. याबद्दल आपल्या नागरिकांवर दरडोई दरदिनी काही कर बसवण्यात येत आहे त्यामुळे आपल्या एकूण उत्पन्नात फरक न पडता परस्पर आपले संरक्षण होत राहिल व त्याबदल्यात आपणास सर्व मंत्र्यांचे हप्ते वाढवता येऊ शकतील. हा कर नवजात अर्भकावरही लावण्यात येईल अशी व्यवस्था आहे महाराज.

महाराज: आम्हास आमच्या सेनापतीवर गर्व वाटतो आहे. त्यांनी रक्तपात न करता अजातशत्रूंस बेमालूम नमविले याबद्दल त्यांना आपल्या राज्यातील कुठल्यातरी शेतकऱ्याची जमीन बक्षीस देण्याची व्यवस्था करा प्रधांजी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज, पण या सर्वांची कल्पना मुळात आमची आहे याची महाराजांनी नोंद घ्यावी अशी आमची विनंती आहे महाराज.

महाराज : ते ठीक आहे प्रधांजी, त्याबद्दल आपणास ही दुसऱ्या कुणा शेतकऱ्याची जमीन आम्ही देत आहोत.

प्रधानजी : thank you, महाराज.

महाराज : प्रधांजी, पण आमच्या कानावर मारूतमल शेठांबद्दल जे काही आले आहे त्याबद्दल काही सांगावे.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. महाराज, महसूल आणि अर्थ खात्यास मारूतमल शेठ यांनी सात अब्ज सुवर्ण मुद्रांचा कर चुकविला आहे असे लक्षात आले आहे. गेला महिनाभर मारूतमल शेठ आपणाबरोबर सावलीप्रमाणे होते त्यामुळे याबाबतीत निर्णय झालेला नाही अजून, पण यामध्ये त्यांच्या सारख्या असामींस तोशिस पडू नये याची सर्व काळजी आम्ही जातीने घेत आहोत. .

मध्येच त्यांचे वाक्य तोडत...

महाराज : प्रधांजी, आपल्या राज्यातील मारूतमलशेठ हे बडे असामी आहेत हे लक्षात असू द्यावे. संपत्तीनिर्मितीत त्यांचा मोठाच हातभार आहे त्यामुळे त्यांस मनस्ताप व्हावा असे कोणतीही बाब आमच्या नजरेत आल्यास त्यांची गय केली जाणार नाही याकडे सर्वांनी लक्ष द्यावे, तुर्तास अर्थखात्याच्या

कार्यालयातील दारवानास या कृत्याबद्दल तोफेच्या तोंडी द्यावे असा आमचा हुकूम आहे.

प्रधानजी : जी महाराज, हुकुमाची तामिली होईल.

महाराज : आपल्या राज्यात जे कोणी उद्योगपती संपत्तीनिर्मितीच्या कार्यात आपले जीवन अर्पण करित आहेत त्या सर्वांस अभय दिले जाईल. एका विशिष्ठ मर्यादेपलिकडे जर त्यांस कर द्यावा लागत असेल तर तो आपल्या प्रजाजनांकडून वसुलावा आणि बिचाऱ्या उद्योगपतींची त्या ताणातुन सुटका करावी असा आमचा आदेश आहे.

प्रधानजी : होय महाराज, मारूतमलशेठजींच्या कराची रक्कम आपल्या प्रजाजनांवर उद्योग कर बसवून वसूल केला जाईल. बाकी सर्व मोठ्या उद्योगांबाबतही हेच धोरण ठेवण्यात येईल महाराज. महाराजांनी काळजी करू नये, आम्ही जातीने यात लक्ष घालू.

महाराज : प्रधांजी आम्हांस तुमचा अभिमान वाटतो, आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you, महाराज.

तेवढ्यात एक शिपाई येऊन महाराजांच्या हातातील फुलावर अत्तराचा फवारा मारतो.

महाराज : प्रधांजी, हे काय आहे?

प्रधानजी : महाराज मागे एका माशीने आपल्या दरबारात येण्याचे औद्धत्य दाखविले होते तेव्हापासून आम्ही खरी फुले न आणता ही कागदी फुले वापरण्याचा हुकूम दिला आहे. तसेच आपल्या प्रजाजनांस सक्तीने माशा मारण्यात गुंतविले आहे. राज्यात अजून पर्यंत सत्तावीस अब्ज एकोणऎंशी लाख पाच

हजार एकोणवीस माशांचा संहार करण्यात आला आहे, ज्या नागरिकाच्या घरी जिवंत माशी आढळेल त्यास तोफेच्या तोंडी देण्याचे हुकूम काढले आहेत. त्यानुसार आज एकशे पंधरा प्रजाजन तोफेच्या तोंडी जाण्याची वाट पाहात आहेत. सगळीकडे प्रजाजन हातात फटका धेऊन माशांशी लढताहेत महाराज.

महाराज : प्रधांजी, आपणांचा आम्हास अभिमान वाटतो.

प्रधानजी : thank you महाराज. महाराज आपल्या कायदे खात्याने नवीन कायदा करण्याचा घाट घातला आहे. त्यानुसार सरकारदरबारातील उच्चपदस्थांस खास संरक्षणाची व्यवस्था आहे. त्या सर्व उच्चपदांवरील व्यक्तींस आपले अधिकार वापरता येतील पण आपल्या निर्णयांची जबाबदारी मात्र त्यांच्यावर यापुढे राहाणार नाही. ही जबाबदारी त्यांच्या खात्यातील सर्वात कनिष्ठ कारकुनावर असेल. तेव्हा काही घोटाळे झाल्यास त्यांच्यावर कारवाईची व्यवस्था होईल. त्यामुळे सर्व उच्चपदस्थ स्वस्थ मनाने कारभार करू शकतील. त्यांच्यावरील कार्यभार कमी होण्याच्या दृष्टीने त्यांना ही खास मदत होईल महाराज.

महाराज : प्रधांजी, आम्ही खूप खुश आहोत, आम्हाला तुमचा अभिमान वाटतो, तुम्ही आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you, महाराज.

प्रधानजी : महाराज, पथकराबाबतीतील आपल्या धोरणाने राज्याच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली आहे. अजून रस्ते बांधण्यास वेळ आहे तेव्हा हा पथकर निधी दुसऱ्या कामाकडे तात्पुरता वळवण्यात यावा असे अर्थ खात्याचे म्हणणे आहे म्हणजे त्यातून आपल्या मुदपाकखान्यात उत्तम प्रतीचा तांदूळ खास

दूरच्या भातबेटावरून आयात करण्याचे ठरविले आहे, महाराजांना भाताचे प्रकार खास आवडतात म्हणून ही व्यवस्था करावी असा निर्णय आहे महाराज.

खाणे म्हणले की महाराजांना भूक लागायला लागते.

महाराज : प्रधांजी, लवकर आमच्या खाण्याचा प्रबंध करा, आम्ही ह्या राज्यकारभाराने शिणलो आहोत, आम्हास उद्यापर्यंत विश्रांतीची गरज आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : त्याआधी आपल्या सांस्कृतिक कार्यमंत्र्याचे खास अभिनंदन करायचे आहे, आपल्या राज्यावर अजातशत्रुंचा हल्ला झाला त्याची तमा न बाळगता त्यांनी ज्या मेहनतीने गेला महिनाभर संस्कृती जतन केले त्याबद्दल त्यांना आपल्या राज्यातील एखाद्या शेतकऱ्याची जमीन बक्षिस द्यावी असा आमचा हुकूम आहे.

जावयांच्या सन्मानाने प्रधानजी सुखावतात.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : दरबार बरखास्त

सर्व दरबारी : महाराजांचा विजय असो.

(४)

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. त्यांच्या हातात एक  फूल. तेही खरे नाही पण खरे वाटावे म्हणून त्यावर एक नकली माशी पण बसवलेली आहे. महाराजांचे नेहमी प्रमाणे लक्ष नाही, ते चुकून त्या माशीचाच वास घेतात.

आज दरबारात येतानाच त्यांच्या रागाचा पारा चढलेला आहे. प्रधानजींना ते हाल हवाल विचारायच्या आधीच ते सुरू बोलणे सुरू करतात.

महाराज : आज आम्ही खूपच नाखूश आहोत.

सर्व दरबारी चिंतेत पडतात. आज कोणा कोणाचा तोफेतोंडी जाण्याचा नंबर लागेल याचे सर्वांना टेंशन येते.

प्रधानजी : माफी असावी महाराज. कोणाच्या हातून हा प्रमाद घडला हे कळले तर महाराजांच्या आज्ञेनुसार त्यांना कडक शिक्षा केली जाईल महाराज.

महाराज : प्रधांजी, मारूतमल शेठ यांच्या कर वसुलीसंबंधात पुढे काय झाले याची आम्हास पूर्ण खबर पाहिजे.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज, याबाबत हा कर वसूल करण्यासाठी अधिकारी त्यांच्या कारखान्यांजवळ राहणाऱ्या प्रजेकडून वसूली करत आहेत. या वर आपण काही प्रमाणात कर वाढवला आहेच.

महाराज : प्रधांजी, तरीही शेठजींकडे कर थकबाकी आहे हे का शोधण्यात आले? आमचा हुकूम आहे ज्या कोणा कारकुनाने त्यांच्या करासंबंधात छाननी केली त्याचे हात कलम करा, तेही ताबडतोब. याबाबत यापुढे कोणाचीही अशी हिंमत होऊ नये म्हणून अशी कडक कारवाई जरूरी आहे. आपले राज्य शेवटी न्यायाचे आहे, ते न्यायानेच चालले पाहिजे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या हुकुमाची शीघ्र तामिली होईल महाराज.

महाराज : आणि आम्ही आपल्या कायदे मंत्र्यांवर नाराज आहोत.

कायदेमंत्री घाबरतात. त्यांची तोफेतोंडी जायची पाळी येते की काय म्हणून प्रधानजी घाबरतात. कारण ते त्यांचे दूरचे काकाच असतात.

महाराज : आपल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी मिळवण्याबाबत त्यांनी जो कायद्याचा मसुदा बनविला आहे त्याबद्दल आमच्याकडे सर्व श्रीमंताकडून आणि शेठांकडून तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे त्यांना शेतकऱ्यास मोबदला द्यावा लागणार आहे. काही मोबदला देण्यास ते तयार आहेत पण या कायद्यात अशा तरतुदी मंत्र्यांनी केल्या आहेत की त्यामुळे त्यात कोणतीही पळवाट सोडली नाही. अशाने सर्व संबंधितांच्या जिवावर आणि संपत्तीवर टाच येईल. काहींना नाहक तुरूंगात टाकावे लागेल. त्यांना साजेसे तुरूंग आपल्या राज्यात नाहीत. परत तसे तुरूंग बनवून मोठ्या व्यक्तींची बडदास्त ठेवणे याचा आपल्या तिजोरीवर भार पडेल. आपल्या गरीब जनतेवर अजून नवीन तुरूंग निर्माण कर लावण्याची आमची इच्छा नाही प्रधांजी. कायदे मंत्री काही नवीन नाहीत. कायदा बनवताना त्यातून सुटण्याच्या पळवाटा त्यातच बनवून ठेवाव्या लागतात हे त्यांना आम्ही सांगावे असे नाही. लवकरात लवकर त्यांना हत्तीच्या पायी देण्याचा आमचा हुकूम आहे. यापुढे जो कायदा बनेल त्यात अश्या पळवाटा उच्चपदस्थांसाठी ठेवणे बंधनकारक असेल, हा आमचा हुकूम आहे.

शिपाई येऊन कायदेमंत्र्यांना घेऊन जातात.

प्रधानजी : माफी असावी महाराज, लहान तोंडी मोठा घास घेतो आहोत. अभय असेल तर आम्ही बोलतो.

महाराज : बोला प्रधांजी, आपणास नेहमीच अभय आहे.

प्रधानजी : क्षमा असावी, पण आपण हल्लीच कायदा केला त्याप्रमाणे उच्चपदस्थांच्या खात्यातील काही गफलतीस त्या खात्यातील सर्वात कनिष्ठ कारकुनास जबाबदार राहावे लागेल असे ठरवण्यात आले आहे.

महाराज : प्रधांजी, ठीक आहे बोलवा कायदेमंत्र्यांना परत. आणि द्या कारकुनास तोफेतोंडी. कोणाला तरी का होईना शिक्षा ही झालीच पाहिजे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

कायदेमंत्री मृत्युच्या दारातून परत येतात, प्रधानजींकडे कृतज्ञतेने पाहातात.

तेवढ्यात कोणातरी तरूण माणसाला शिपाई पकडून दरबारात हजर करतात.

महाराज : प्रधांजी, हा काय गोंधळ आहे?

प्रधानजी : महाराज, हा आपल्या राज्यातील एक चित्रकार आहे. त्याने आपल्या चित्रात सिंहासनावर एक उंदीर बसून राज्य चलवतो असे दाखवले आहे. त्याच्या म्हणण्या प्रमाणे हे लहानमुलांच्या गोष्टीच्या पुस्तकातील चित्र आहे. तरी त्या सिंहासनाच्या एका बाजूच्या सिंहाच्या शेपटीचा आकार हुबेहूब आपल्या सिंहासनाशी जुळणारा आहे. आपला उपमर्द केला म्हणून या चित्रकारास जेरबंद केले आहे महाराज.

महाराज : आपल्या बारीक नजरेचा आम्हाला अभिमान वाटतो प्रधांजी.

प्रधानजी : thank you महाराज. या चित्रकारास आपण सजा फर्मावावी महाराज.

महाराज : प्रधांजी, पण त्याचे म्हणणे काय आहे या चित्राबद्दल?

प्रधानजी : महाराज त्याचे म्हणणे आहे की आपण ढोलकीच्या तालावर कार्यक्रमातील भाषणात कलाकारांना पूर्ण स्वातंत्र्य असेल असे म्हटले आहे. त्यानुसार उंदीर आणि मांजराची गोष्ट सांगण्यासाठी हे चित्र काढले आहे म्हणे.

महाराज : हॉ बाब खरी आहे. त्यास जसे स्वातंत्र्य आहे आहे तसे आपल्या शिपायांस त्यास पकडून नेण्याचे पण स्वातंत्र्य आहे हे हा चित्रकार विसरला आहे.

प्रधानजी : यास काय सजा करावी महाराज?

महाराज : प्रधांजी, यास गाढवावरून धिंड काढून राज्याबाहेर हाकलून द्यावे. त्यामुळे असा गुन्हा करण्याची कोणाची हिंमत होणार नाही. आमचे राज्य न्यायानेच चालणारे राज्य आहे. आणि ज्या कोणी आमचे ते भाषण तयार केले त्यास शोधून त्याच्या हाताची बोटे कलम करा हा आमचा हुकूम आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या न्यायदानाची कीर्ती त्यामुळेच सर्वत्र पसरली आहे महाराज.

शिपाई त्या चित्रकारास घेऊन जातात, गाढवाच्या शोधाला लागतात आणि महाराजांच्या आज्ञेच्या पालनास लागतात.

प्रधानजी : महाराज, दिवसेंदिवस महागाई वाढते आहे, त्यामुळे आपल्या राज्याचा खर्च चालवणे जिकीरीचे होत आहे. महागाई कराने काही सुधार झाला परंतु आपल्या मंत्र्यांचे पगार वाढवण्यात हा पैसा खर्च होत आहे. त्यामुळे नवे कर बसवण्यासाठी योजना बनविल्या आहेत.

महाराज : प्रधांजी, आपले मंत्रिमंडळ अत्यंत हुशार आहे, एकेक रत्ने आम्ही त्यात घेतली आहेत, त्यामुळे या योजना कोणत्या असाव्यात यांची आम्हाला उत्सुकता वाटत आहे.

प्रधानजी : thank you महाराज. आपल्या राज्यात पाण्याएवढीच हवा ही वापरली जाते. आपण आहात म्हणून ही हवा आहे. दर श्वासागणिक प्रत्येक जण ही हवा वापरत आहे, तेव्हा पाणीपट्टीप्रमाणे हवापट्टी आपण लागू करावी असे आम्हास वाटते.

महाराज : आम्ही म्हटले ते खरेच आहे. आपण सर्व खरीखुरी रत्ने आहात.

प्रधानजी : thank you महाराज. हा कर प्रत्येक जिवंत व्यक्तीस भरावा लागेल. ज्यांना दम्यासारखे विकार आहेत त्यांच्याकडून जास्त हवा शोषली जाते. त्यांना ज्यादा कर आकारावा अशी वैद्यांची शिफारस आहे.

महाराज : वा प्रधानजी ! आपल्या दृष्टीचा आम्हाला अभिमान वाटतो आहे. आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज. यामुळे राज्यास अखंड उत्पन्न मिळू शकते. यातून सरदारांचा तनखा वाढवावयास मदत होईल असे धोरण आहे. या शिवाय महाराज आपल्या चक्रमपुरी आभूषण, चक्रमपुरी भूषण पुरस्कारांसाठी निवड झाली आहे, ती महाराजांनी मंजूर करावी अशी सांस्कृतिक खात्याची अर्जी आहे.

महाराज : प्रधांजी, आपण निवडलेल्या व्यक्ती योग्यच असणार. सांगावे पुढे.

प्रधानजी : thank you महाराज. चक्रमपुरी आभूषण म्हणून आम्ही मारूतमल शेठ यांचे नाव सुचवले आहे.

महाराज : वा प्रधांजी. आम्ही खूश आहोत.

प्रधानजी : thank you महाराज. आणि चक्रमपुरी भूषण म्हणून यशवंत शेठ यांना सन्मान द्यावा असे सुचवले आहे. यशवंत शेठ यांची पुष्पक विमान सेवा आपल्या सेवेत सदा तत्पर असते. त्यांनी आपल्या खजिन्यातून एक लक्ष सुवर्णमुद्रा कर्जाऊ घेतल्या होत्या, या निमित्ताने ते माफ करून ते कर्ज जनतेकडून वसूल करण्याचा आदेश द्यावा असे आम्हाला वाटते.

महाराज : वा प्रधांजी ! ते खरेच आपल्या राज्याचे भूषण आहेत.

प्रधानजी : या शिवाय महाराज या वेळी चक्रमपुरी जीवन गौरव देण्याची शिफारस आहे. यावेळी आपले युवराज अधर्मसेन यांस हा पुरस्कार द्यावा असे आम्हाला वाटते. त्यांनी आपल्या पाचव्या वर्षीच अश्वारोहण करण्यात प्राविण्य मिळवले आहे त्याबद्दल त्यांचा गौरव व्हावा असे वाटते.

महाराज : प्रधांजी आम्हाला आपला अभिमान वाटतो.

प्रधानजी : thank you महाराज. याशिवाय महाराजांपुढे एक विनंती होती.

महाराज : निर्धास्त बोलावे प्रधांजी.

प्रधानजी : माफी असावी महाराज, पण तोफेच्या तोंडी देण्यास तोफा अपुऱ्या पडत आहेत तेव्हा नवीन तोफा घेण्याची संरक्षण मंत्र्यांची विनंती आहे.

महाराज : प्रधांजी, आपले राज्य हे न्यायाचे राज्य आहे, त्यामुळे त्यासाठी जर तोफा कमी पडत असतील तर नवीन न घेता सीमेवरून आणाव्यात. अजातशत्रू महाराज आपल्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी घेत असताना सीमेवरील तोफा काढून या कामी लावाव्यात असे आम्हास वाटते. त्यामुळे तिजोरीवरील भार वाचेल.

प्रधानजी : जशी आज्ञा महाराज.

महाराज जोरात जांभई देतात.

महाराज : आज आम्हास कामाचा खूपच भार पडला आहे. आम्ही शिणलो आहोत. मुदपाकातून भाताचे सुवास आम्हास बोलावित आहेत. तेव्हा हा कारभार आटोपता घ्यावा अशी आमची आज्ञा आहे.



प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : दरबार बरखास्त.

सर्व दरबारी : महाराजांचा विजय असो.

( ५ )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. त्यांच्या हातात एक फूल. यावेळी ते खरे फूल आहे. महाराज त्या फुलाचा वास घेतात. आज महाराज पूर्ण पणे जागे आहेत. त्यांना गुलाबाच्या फुलाचा गंध येतो. महाराज खूश होतात.

महाराज : प्रधांजी, आम्ही आज खूप खूश आहोत. आज कित्येक दिवसांत हे खरे फूल दिसत आहे.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही फूल देत नव्हतो. आता माशा मारण्याची जबाबदारी आपल्याच प्रजेने घेतली आहे. घरोघरी लोक माशा मारत आहेत. कित्येक जण माशा मोजत आहेत. लोकांच्या हातात आता काम आहे. आज पर्यंत सुमारे पंचवीस अब्ज माशा मारून झाल्या आहेत. दोनशे सदोतीस लोकांना त्यांच्या घरी जिवंत माशा दिसल्या म्हणून तोफेतोंडी देण्यात आले आहे. आता खरे फूल हाती देणे सुरक्षित आहे.

महाराज : आम्हाला तुमचा अभिमान वाटतो प्रधांजी. आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : प्रधांजी, कशी आहे राज्याची हालहवाल?

प्रधानजी : आपल्या कृपेने सर्व उत्तम आहे महाराज. अजातशत्रू आपल्या सुरक्षेची काळजी घेताहेत. राज्यातील माशा मेल्या आहेत. कित्येक जण तोफेतोंडी जाता आहेत. तिजोरी भरलेली आहे. आणि महाराज्यांच्या मुदपाकात भाताच्या नव्या नव्या जाती आम्ही जातीने भरून ठेवल्या आहेत. आज खूप दिवसांनी नवे काही संकट असेल असे दिसत नाही.

महाराज : आम्हाला तुमचा खूप अभिमान वाटतो प्रधांजी.

प्रधानजी : thank you महाराज. फक्त पाणी खात्यातील पाण्याच्या अफरतफरीची परत तक्रार आली आहे महाराज. मागील महिन्यातच ह्या बाबतीत आपण शिक्षा दिल्या होत्या. आता नव्याने तक्रारी आहेत.

महाराज : मग परत कारकुनांस तोफेतोंडी द्या.

प्रधानजी : आज्ञा शिरसावंद्य महाराज. पण क्षमा असल्यास आपल्या नजरेस एक बाब आणून द्यायची आहे.

महाराज : बोला प्रधांजी, आपणास सदैव अभयच आहे.

प्रधानजी : क्षमा असावी पण पाणी खात्यातील सर्व कारकुनांस तोफे तोंडी देऊन झाले आहे. आता कोणी कारकून उरलेला नाही. आपले मंत्री एकहाती हे खाते सांभाळत आहेत. तेव्हा महाराजांनी याबाबतीत. . .

महाराज : याबाबतीत काय प्रधांजी? नवीन कारकुनास नेमा आणि मग तोफेतोंडी द्या. आपल्या मंत्र्यांस याबाबतीत त्रास होता नये.

प्रधानजी : जशी आज्ञा महाराज.

पाणी खात्याचे मंत्री सुटकेचा निश्वास टाकतात. चुकून बोलून जातात.

पाणी खात्याचे मंत्री : धन्यवाद महाराज. आम्ही जन्मभर ऋणी राहू.

महाराज : खामोश ! कोणाचा आवाज आहे? प्रधांजींशिवाय आमच्या दरबारात कोणी बोलायला मनाई आहे. या पाणी मंत्र्यांना ताबडतोब हत्तीच्या पायी द्या.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

शिपाई येऊन मंत्र्यांना घेऊन जातात. दरबार स्तब्ध होतो.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या हुकुमाची तामिली होईल महाराज. आणि आपल्या हुकुमानुसार आपल्या सीमेवरील तोफा आणल्यामुळे राज्य कारभार गतिमान झाला आहे. आपल्या तोफेतोंडी जाणाऱ्यांची वेटिंग लिस्ट कमी झाली आहे महाराज.

महाराज : आम्ही आपणावर खूश आहोत प्रधांजी.

प्रधानजी : आपली अनुमति असेल तर महाराज आपल्या सेवेस एका कविराजांस पेश करायची इच्छा आहे.

महाराज : हे नवीन काय प्रधांजी?

प्रधानजी : महाराज कुळपुरातून एक तरूण कवी कुलदूषण चरणलीन भाट आले आहेत. त्यांना महाराज स्तुती ऎकवायची इच्छा आहे.

महाराज : बोलवा त्यांना आत.

शिपाई एका तरूणास घेऊन येतात. तो महाराजांस वाकून नमस्कार करतो. प्रधानजींच्या सुचनेनुसार तोंडातून शब्द काढत नाही.

प्रधानजी : महाराजांची आज्ञा असेल आणि अभय असेल तर कविराजांस आपली स्तुती ऎकवायची इच्छा आहे.

महाराज : आम्ही खूश आहोत. परंतु आम्हास काव्य पसंत नसेल तर ताबडतोब शिरच्छेद केला जाईल.

कवी घाबरून मागे सरतो.

महाराज : आमची आज्ञा आहे, आता मागे सरणे नाही. सुरू करा.

कवीस दुसरा सुटकेचा मार्ग नाही. घसा खाकरून तो आपली महाराज स्तुती सुरू करतो.

कवी कुलदूषण :

हे दिव्य दिव्य महाराज

चालविता आपण रामराज

दरबारी येऊनि आज

आपल्या स्तुतिचा घालतो घाट

हा क्षूद्र चरणलीन कवि भाट

काय कर्तृत्व सांगावे

काय न्याय अन्याय पाहावे

पाहून हृदय उचंबळून यावे

महाराजांचा काय हा थाट

म्हणे हा चरणलीन कवि भाट

तोफे तोंडी जाती गुन्हेगार

पाहूनी होती सारे गपगार

मग असो बालक, नर वा नार

महाराज उभे एकटे ताठ

म्हणे हा चरणलीन कवि भाट

चुकांना नाही इथ क्षमा

भेटण्या दाविति यमा

न्यायाची होई परिसीमा

एक तुम्हीच चक्रमादित्य सम्राट

म्हणे हा चरणलीन कवि भाट

प्रजेहिताचीच ही मुद्रा

जनहिते उडतसे निद्रा

पाहिती सर्व हाती सोडून मदिरा

एक तुम्हीच महाराज, बाकी सत्राशे साठ

म्हणे हा चरणलीन कवि भाट

राजाचे काय तेज, काय प्रताप

भव्य दिव्य छत्र चामरे आणि चाप
शौर्याच्या कथा ऐका हो बाप
शत्रूशी पडेल ना रणी कधी गाठ
म्हणे हा चरणलीन कवि भाट

आकाशी सूर्य आणि चंद्र
स्वर्गातून पाहितसे देवेन्द्र
हा कोण भूतली शूरवीर नरेन्द्र
एक तुम्हीच चक्रवर्ति सम्राट
म्हणे हा चरणलीन कवि भाट

जोवरी नभी चंद्र आणि रवि
भूतली भुपेन्द्र राज्य तोवरी
चक्रमादित्य महाराजांच्या ओवरी
जर कोणी लावी राज्यास नाट
म्हणे हा चरणलीन कवि भाट

प्रजा  होतसे धन्य

नृपति आणि नको आम्हा अन्य

जन किती जाहले सुज्ञ

राज्यी महाराज प्रेमाची येई लाट

म्हणे हा चरणलीन कवि भाट

चक्रमादित्यमहाराजांचा विजय असो.

वाकून त्रिवार मुजरा करून कुलदूषण उभा राहातो,

महाराज : वा ! आम्ही खूश आहोत आपणावर. प्रधांजी, आपल्या गळयातील हार या कविराजांस बक्षीस द्या.

प्रधानजी अडखळतात पण इलाज नसल्याने गळयातील हार कविराजांस नजर करतात. कविराज काही बोलणार तोच जीभ चावतात. एकाएकी महाराज कडाडतात तसे दचकतात .

महाराज : या कविराजांस तोफेतोंडी द्या. आमच्या दरबारात प्रधांजींशिवाय कोणासही बोलायची परवानगी नाही हे आपणास ठाऊक असायास हवे.

प्रधानजी गडबडतात. कविराज हातातील सोन्याचा हार घेऊन पांढरे फटक पडतात आणि प्रधानजींकडे पाहातात.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज, पण आपणच आज्ञा दिली होती. आणि आपणास काव्य पसंतही पडले आहे.

महाराज : प्रधांजी, कायदा म्हणजे कायदा. आमचे राज्य नियमानुसारच चालेल. आणि आम्ही शिरच्छेदाबद्दल बोललो होतो. आता आम्ही शिरच्छेद करणार नाही आहोत. तर तोफेतोंडी द्यावयास सांगत आहोत. आम्ही आमचा शब्द पाळत आहोत. तरी प्रधांजींच्या इच्छेनुसार कविराजांस सोडून द्या आणि ज्या कोणी यांस आमच्या दरबारात आणले त्या शिपायास तोफेतोंडी द्या. कोणासतरी काहीतरी शिक्षा ही व्हायलाच हवी.

प्रधानजी : जशी आज्ञा महाराज.

कविराजांच्या पायातील त्राण परत येते.

महाराज : आज मुदपाकातून खास सुवास येत आहे प्रधांजी.

प्रधानजी : जी महाराज. खास श्रीलंकेतून मागवलेल्या तांदुळाचा भात शिजत आहे महाराजांसाठी.

महाराज : आता आम्ही ह्या राज्य कारभाराने शिणलो आहोत. भोजनानंतर आम्ही विश्राम करणार आहोत.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : दरबार बरखास्त.

सर्व दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

( ६ )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य दरबारात येतात. सिंहासनावर बसतात. आपल्या हातातील गुलबक्षीच्या फुलाचा वास घेतात. महाराजांना सर्दी झालेली, त्यामुळे आधीच वासहीन फुलाचा वास येत नाही. चिडून ते प्रधानजींकडे वळतात. प्रधानजी नेहमीप्रमाणेच अति सावध असतात. महाराज कोणाला यासाठी तोफेतोंडी देतील याचा नेम नाही. महाराज काही बोलणार त्याआधीच ते म्हणतात,

प्रधानजी : महाराजांचा विजय असो. आज आपल्याला एक अत्यंत चांगली बातमी द्यायची आहे महाराज.

महाराजांचा मूड बदलतो. क्षणार्धात त्यांना परत 'ढोलकीच्या तालावर' चे आयोजन करतात की काय असे वाटते. पण त्यांच्या लक्षात येते की गावोगावचे कलावंत अजून स्वत:च्या गावी पण पोचले नसतील. तेवढ्यात परत काही ते ढोलकीच्या तालावर होणे नाही. महाराज ऐकू लागतात.

प्रधानजी : महाराज आपल्या राज्यातील नागरिकांनी आजपर्यंत एकशे पंचवीस अब्ज माशा मारल्या आहेत. आज आपले चक्रमपुर माशी मुक्त राज्य झाले आहे. मक्षिकामुक्त असे हे एकच राज्य आहे भूतलावर, ज्याच्यावर आपल्या सारख्या चक्रवर्तींचे राज्य आहे.

महाराज : वा प्रधांजी वा ! ही फारच चांगली बातमी आहे, आम्ही खूश आहोत आपणावर. आज मक्षिकामुक्त नगरीत आपले प्रजाजन अगदी आनंदात झोपू

शकतील. तरीही शेजारील राज्यातून घुसखोर माशा येत नाहीत ना यावर डोळयात तेल घालून लक्ष ठेवा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज, आपल्या राज्याच्या सीमेवर माशांवर लक्ष ठेवायला सैनिकांचा खडा पहारा आहे महाराज.

महाराज : आम्हाला तुमचा अभिमान वाटतो प्रधांजी. आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज. एक समस्या मात्र आज उभी राहिली आहे.

समस्या म्हणताच महाराजांच्या कपाळावर आठ्या पडतात.

प्रधानजी : आपले एक मंत्री रंगरावजी मोहिते हे आपल्या राज्य्ातून आपल्या हत्ती आणि घोड्यांवरून शिकारीस जात होते. त्यांस आपल्या पथकर कारकूनाने अडवले आणि कराची मागणी केली. आपल्या हुकुमात कोणाचाही अपवाद करू नये असे स्पष्ट निर्देश असल्याने हा कर मागितला गेला. आपल्या मंत्र्यांच्या इभ्रतीस त्यामुळे धक्का बसला. त्यांनी कारकुनास समजावून पाहिले पण कारकुनाच्या म्हणण्यानुसार त्याला कायदापालन आवश्यक होते. जवळील एक गस्तीवरील शिपाई सुद्धा त्यात सामील झाला. रंगरावांच्या संयमाचा अंत पाहिला गेला तेव्हा त्यांनी आणि त्यांच्या बरोबरीस घोड्यावर असलेल्या त्यांच्या हंबीरराव आणि खंबीरराव या पुत्रांनी आपले हत्ती आणि घोडे या कारकुनांवर घातले. दोघेही इजाग्रस्त आहेत. याबाबतीत आपले मार्गदर्शन हवे महाराज.

महाराज : प्रधांजी, आमचे निर्देश स्पष्ट आहेत. कायदा सर्वांस समान आहे आणि आमच्या राज्यात सर्व काही कायद्यानुसारच चालेल. त्यामुळे कर हा कोणासही द्यायलाच हवा. मग तो मंत्री असो की आणि कोणी. फक्त आमचा अजून एक निर्देश आहे तो असा की अशा ज्या महत्त्वाच्या व्यक्ती आपल्या

कर्तव्यपालनासाठी जात असतील त्यांच्या वाहनांवरील कर पथकर कर्मचाऱ्याने स्वत:च भरावा म्हणजे कर पण मिळेल आणि त्या मंत्र्याची इभ्रत पण वाचेल. येथे त्या कारकुनाने असे केले असते तर त्यांस नाहक इजा झाली नसती, आम्हाला आमच्या मंत्र्यांबद्दल सहानुभूती आहे. आजच फर्मान काढा आणि अशा बाबतीत हयगय नको आणि कर चुकवेगिरीही सहन केली जाणार नाही. सध्या त्या दोघांवर उपचार करा नि संपूर्ण बरे झाल्यावर दोघांस तोफेतोंडी द्या. गुन्ह्यास शिक्षा ही झालीच पाहिजे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आजच असे फर्मान आम्ही काढून पाठवित आहोत. आपल्या न्यायदानाबद्दल म्हणूनच देश विदेशात ख्याती आहे महाराज.

महाराज : आपल्या मंत्र्यांसच असे कर भरावे लागले तर त्यांचे घराबाहेर पडून लोकांत मिसळणेच बंद होईल प्रधांजी.

प्रधानजी : जी महाराज.

महाराज : अजून काही नवीन कामकाज प्रधांजी?.

प्रधानजी : नाही महाराज. फक्त गेल्या मोसमात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने जरा पाणी टंचाई जाणवत आहे पण आपल्या लाडक्या ऐरावतास पाण्यात डुंबण्याची आवड आहे हे लक्षात घेऊन नागरिकांसाठी पाण्याची कपात करून ते आपल्या ऐरावतास पुरवण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे आपणास चिंता नसावी महाराज.

महाराज : प्रधांजी, आम्हाला तुमचा अभिमान वाटतो.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : प्रधांजी, आज आम्हाला आमच्या शौर्याची गोष्ट सांगायची आहे.

प्रधानजी : आपण मूर्तिमंत शौर्य आहात महाराज. म्हणूनच आपली कीर्ती दिगंतरात पोहोचली आहे, आपले नवीन साहस ऐकावयास सर्वच दरबारी आतुर आहेत महाराज.

महाराज : काल आम्ही आमच्या महालात एकटेच होतो. आमच्या पहाऱ्यावरील शिपायास आम्ही काही कामनिमित्त पाठवून दिले, त्यानंतर आमच्यावर हल्ला झाला.

प्रधानजी : काय महाराज? प्रत्यक्ष महाराजांवर हल्ला? कोणी हिंमत केली ही?

महाराज : होय, काल आमच्यावर अचानक हल्ल्ला झाला. आमच्या महालात एका झुरळाने हा हल्ल्ला चढवला. त्यास पंख ही होते. आम्ही मोठ्या धैर्याने त्याचा मुकाबला केला. आमची नेमबाजी चांगली म्हणून आम्ही अर्ध्या घटिकेत त्या झुरळास आमच्या बाणाने लोळवू शकलो. आम्ही त्यानंतर थकून गेलो होतो. आज त्या शिपायास आम्ही हत्तीच्या पायी देण्याचा आदेश देत आहोत. आम्हीच त्यांना आज्ञा केली होती पण तरीही आज्ञा पालन कधी करू नये हे समजत नसेल तर अशा शिपायास देहदंड हा झालाच पाहिजे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आजपासूनच झुरळांच्या कत्तलीचे आदेश काढले जातील. सैनिक आता प्राणपणाने झुरळांच्या मागे लागतील. आणि आपल्या नागरिकांसही या कामी लावू.

महाराज : झुरळाची शिकार ही सामान्य माशी मारण्यासारखी बाब नाही प्रधांजी. आपणास त्यासाठी जनतेला शिकवायला लागेल. तो पर्यंत आपल्या शूर सैनिकांना या बद्दल आदेश द्या. या बाबतीतली अंमलबजावणी कशी हो आहे याची आम्हास दैनंदिन माहीती द्या हे आमचे सक्त आदेश आहेत.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या हुकुमाची ताबडतोब तामिली होईल महाराज.

महाराज : आज आम्हाला इथेच थांबावेसे वाटते. कालच्या आमच्यावरील हल्ल्याने आम्ही थकलो आहोत. आणि कालचे भाताचे प्रकार फारच छान होते प्रधांजी. आपल्या सारखे प्रधांजी असताना आम्हाला राज्याची काळजी नाही.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : दरबार बरखास्त.

सर्व दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.



( ७ )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य दरबारात येतात. सिंहासनावर बसतात. आपल्या हातातील जास्वंदीच्या फुलाचा वास नाकाने घेतात. महाराज अर्धवट झोपेत आहेत. जास्वंदाच्या फुलाच्या परागकणांची दांडी नाकात घुसते आणि महाराजांना फटाफट शिंका येतात. महाराज अर्धवट झोपेतून खाड्कन जागे होतात. त्यांचा त्रासिक चेहरा पाहून प्रधानजी काळजीत पडतात. या वेळी बागेचा माळी, दरवाज्यावरील पहारेकरी, महाराजांच्या हातात फूल देणारा सेवक किंवा दरबाराची व्यवस्था बघणारे मंत्री या पैकी कोणीही तोफेतोंडी जाऊ शकतो. प्रधानजींस वाटते आता काही खरे नाही. त्यांना नेहमी आयुष्य क्षणभंगूर आहे हे दररोज नव्याने दरबारात पटते. तत्परतेने प्रधानजी म्हणतात,

महाराजांची प्रकृती बरी दिसत नाही आज. आज्ञा असेल तर आज दरबार आताच बरखास्त केला जाईल.

महाराज : नाही प्रधांजी, कर्तव्य म्हणजे कर्तव्य. आम्ही कितीही गंभीर आजार झाला तरी आमचे काम सोडणार नाही. दरबाराचे कामकाज सुरू करा.

महाराजांच्या लक्षात ते फुलाचे प्रकरण आले नाही याचा प्रधानजींना आनंद वाटतो. आज एक तरी जीव वाचवला याचे समाधान वाटते.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या कर्तव्यकठोरतेचा आदर्श साऱ्या जनतेने ठेवावा असाच आहे. आम्ही हकीमांस बोलावून घेतो. त्यांनी आपली प्रकृती तपासली की दरबार सुरू करता येईल.

महाराज चिडतात.

महाराज : प्रधांजी आमचा हुकूम आहे ताबडतोबीने कामकाज सुरू करा. आमच्या कडे वेळ थोडा आहे. आमच्या शिंकांसारख गंभीर आजार झाला असताना आम्ही राज्याच्या महत्त्वाच्या कामांना निपटून टाकू इच्छितो.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. आपल्या हुकुमाची तामिली होईल. काल आपल्या महालात झुरळाने जो हल्ला केला त्या बद्दल आम्ही सर्वांस हुकूम दिला आहे की माशी मुक्त राज्याप्रमाणे झुरळमुक्त चक्रमपुर लवकरच करावे. आपले सैनिक आता या मोहिमेवर लागले आहेत. घराघरातून झुरळांचा शोध घेऊन ते मारण्याची शिकस्त ते करीत आहेत. आमच्याकडे झुरळांच्या मृतदेहांचा खच पडला आहे आणि आमचे कारकून अखंडपणे त्यांच मोजदाद करत आहेत.

महाराज : प्रधांजी, आपल्या तत्पर कारवाई बद्दल आम्हास आपला अभिमान वाटतो. आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य चालवीत आहोत. आपण आपल्या शौर्याने हे साध्य कराल याबद्दल आम्हास शंका नाही.

प्रधानजी : thank you महाराज. आपल्या राज्यातील शेठ नारायणदास यांच्या विरूद्ध तक्रार आहे.

महाराज : थांबा प्रधांजी. आधी नारायणदासांनी किती कर दिला आहे ते सांगा. किंवा किती कर चुकविला आहे ते सांगा.

प्रधानजी : होय महाराज, त्यांचा कर तीन अब्ज सुवर्णमुद्रा होता त्यापैकी दहा लाखावर कर त्यांनी भरला असून बाकी रक्कम बाकी आहे.

महाराज : हेच तुम्हास दाखवायचे आहे प्रधांजी. आपल्या कित्येक नागरिकांनी एवढी रक्कम कशी असेल याचा विचारही केला नसेल. एखाद्यानी न भरलेला करच एवढा मोठा असेल तर तो माणूस किती मोठा आहे याचा अंदाज आपणास

यावयास हवा. अशा माणसाबद्दल कोणत्याही तक्रारींची नोंद घेऊ नका असा आमचा आदेश आहे. अशी माणसे आपल्या राज्याची भूषण आहेत.

प्रधानजी : जो हुकूम महाराज, नारायणदासांविरूद्धच्या सर्व तक्रारी काढण्याची आम्ही आपल्या हुकुमानुसार तजवीज करत आहोत.

महाराज : आम्ही तुमच्यावर खूप खूश आहोत प्रधांजी.

प्रधानजी : thank you महाराज. महाराज, आपल्या भ्रष्टाचार चौकशी मंत्र्यांनी नवीन कायदा बनविला आहे. आपली संमती असल्यास. . . .

महाराज : भ्रष्टाचाराविरूद्ध कोणताही नवीन कायदा असेल तर आमची संमतीच असेल प्रधांजी. काय आहे नवीन कायदा?

प्रधानजी : आपल्या पदरी असणाऱ्या कोणाही सरकारी नोकराविरूद्ध कोणीही भ्रष्टाचाराचा आरोप केला तर तो खरा मानला जावा. त्यानंतर तो खोटा आहे हे त्या त्या नोकराने स्वत:हून सिद्ध करावे, आपली सरकारी यंत्रणा त्यामुळे त्यात अडकून पडणार नाही. जर त्याने तसे न केले तर तो दोषी समजून त्याच्यावरील आरोपाच्या तीनपट एवढी रक्कम त्यास सरकारी तिजोरीत भरावी लागेल आणि जर त्याने स्वत:स निर्दोष शाबित केले तर आपल्या दरबाराचा वेळ घालवल्या बद्दल त्यास दंड आकारण्याची तरतूद आम्ही सुचविली आहे. त्याचबरोबर चौकशीचा खर्च ही त्याने भरावा. त्यामुळे आपल्यास उत्पन्नाचे एक अजून साधन मिळेल.

महाराज : वा ! प्रधांजी आपण म्हणजे एक रत्न आहात. फक्त या कायद्यातून उच्चपदस्थांस कटाक्षाने वगळा म्हणजे झाले.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आणखी एक महाराज, पथकराची रक्कम राज्याच्या तिजोरीत जमा होत आहे. रस्ते बांधण्यास अजून खूप अवकाश आहे. तेव्हा

ही रक्कम पडून राहण्या ऐवजी त्यातून आपल्या मंत्र्यांस मोफत प्रवास, दारी हत्ती बाळगण्याचा भत्ता, ढोलकीच्या तालावर चे वर्षात दोनवेळा आयोजन वगैरे कामांकडे हा पैसा वळवावा अशी सूचना आहे.

ढोलकीच्या तालावर म्हटल्यावर महाराज नाही म्हणणारच नाहीत याची प्रधानजींस खात्री असते.

प्रधानजी : याशिवाय लोककलांना उत्तेजन देण्यासाठी महाराजांच्या सेवेत दरमास एका कलावंतास पाचारण करावे, लोककलांच्या रक्षणासाठी लोककला कर लावावा ढोलकी बनवणाऱ्यांस उत्तेजन म्हणून काही रक्कम दरमहा द्यावी. अशाही सूचना आहेत. महाराजांचा आदेश असल्यास त्यांची ताबडतोबीने अंमलबजावणी करता येईल.

महाराज : होय, आपण हे अंमलात लवकरात लवकर आणावे असा आमचा आदेश आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : प्रधांजी आम्ही आज अत्यंत नाराज आहोत.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज, पण आपल्या नाराजीचे कारण कळेल काय?

महाराज : आमच्या राज्यात न्यायदान नीट झालेच पाहिजे.

प्रधानजी : न्यायदानाबाबतची आपली कीर्ती तर देशोदेशी पसरलेली आहे.

महाराज : होय, असे असताना आज कोणासही आम्ही तोफेतोंडी द्यायचा हुकूम दिला नाही अजून. आपल्या राज्यातील न्यायाचे काय होणार?

प्रधानजी : काळजी नसावी महाराज. आपल्या राज्यातील एक गरीब शेतकरी आहे तो अत्यंत प्रामाणिक आहे आणि आजपर्यंत त्याने काहीच वाईट कृत्य केलेले नाही. अशा लोकांमुळे आपल्या न्यायदानावर डाग पडतो म्हणून त्याला. . .

महाराज : त्या शेतकऱ्यास ताबडतोब तोफेतोंडी द्या.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज परत जास्वंदीच्या फुलाचा वास घेतात. परत शिंकतात.

प्रधानजी : आपली तब्येत परत ठीक वाटत नाही महाराज.

महाराज : नाही प्रधांजी, हा दोष या जास्वंदाच्या फुलाचा आहे.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण. .

महाराज : पण बिण काही नाही प्रधांजी, आमचा हुकूम आहे, आपल्या राज्यातील सर्व जास्वंदाची झाडे मुळापासून तोडून टाका.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : आणि आमची तब्येत पण बरी नाही आता. त्यामुळे आता आम्ही विश्रांती घेऊ इच्छितो. आजचा दरबार बरखास्त.

सर्व दरबारी: चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

(८)

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य दरबारात येतात. सिंहासनावर बसतात. महाराजांच्या हातात एक एयर फ्रेशनरचा पॅक. त्यावर बाहेरून फुलाफुलांचे चित्र. महाराज त्याचा दीर्घ वास घेतात. त्यांच्या तोंडून वा ! शब्द येतो. दरबारी सर्व दचकतात. प्रधानजी बोलायला तोंड उघडणार तितक्यात महाराजच म्हणतात,

महाराज: काही नका प्रधांजी बोलू

आजपासून पद्यातच कारभार चालू

बोलेल जो गद्यात त्याला तोफेतोंडी देऊ आम्ही

आमचा हा आदेश घ्यावा आजपासून तुम्ही.

महाराज पद्यात बोलतात. कदाचित गाण्याचा प्रयत्नही करतात. सर्व दरबारी परत दचकतात. प्रधानजी सदैव सावध, किंबहुना ते तसे आहेत म्हणूनच प्रधानजी झालेले आणि अजूनही महाराजांच्या तोंडून तोफेतोंडी गेलेले नाहीत. महाराजांच्या आदेशाचा सर्वात जास्त धक्का त्यांनाच बसतो. दरबारात कोणाला बोलायचेच नाही. महाराजांशी फक्त तेच बोलू शकतात. त्यात सर्व कारभाराची कामे पद्यात करून घेणे म्हणजे तारेवरची कसरत. काही चुकले तर नाहक जीव जायचा. प्रधानजी क्षणात सावरतात.

प्रधानजी : शिरसावंद्य हुकूम महाराज

जो जैसा हि हुकूम महाराज

होईल हर हुकुमाची तामिली

देऊ ताकीद सर्वांस चांगली.

महाराज : शाबास प्रधांजी शाबास

तुमच्यानेच आहे आमचे राज्य हे खास

शाबास प्रधांजी शाबास !

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज

थ्यांकू महाराज

आपल्या कृपेने आम्ही

धन्य जाहलो आज.

महाराज : सुरू करा दरबार

आम्हाला उशीर होईल फार

सांगा लवकर आणि झटझट

राज्याची हालहवाल

सुरू करा दरबार

प्रधानजी : हुकुम महाराज हुकुम

आम्ही त्याचे ताबेदार

न्यायी राजाचे आम्ही

एकनिष्ठ शिलेदार

आम्ही हुकुमाचे ताबेदार

महाराज : बोला पटकन वर्तमान

आम्हा सांगा लवकर वर्तमान

प्रधानजी : होय महाराज होय

सांगून नाही सोय

राज्यी होई करचुकव्यांची मौज

जणू झाली उभी कुणी फौज

महाराज : स्पष्ट आमचा हुकूम असे

करचुकव्या जर कुणी दिसे

तोफेतोंडी द्यावे त्यास

नका पुसू मग पुन्हा आम्हास.

जर असेल कोणी तालेवार

तर नको त्यावरी मुळी प्रहार

घ्या जनतेकडूनी वसुली उधार

अन सोडा सत्वर तो तालेवार

प्रधानजी : हो हुकुम महाराज हुकुम

जो हुकुम महाराज हुकुम

पण. . . .

महाराज : पण पण काय वदता?

पण पण काय वदता?

आमच्या राज्यी पाणी पिते

लक्ष्मी अन कविता

महाराजांना नक्की काय म्हणायचे ते प्रधानजींना कळत नाही. एकतर करचुकव्यांत तालेवारांचाच जास्त समावेश असल्याने ते चिडले असावेत किंवा पद्यात बोलणे त्यांना जमत नसावे असे प्रधानजींना वाटले. पण प्रधानजींना हा क्ल्यू पुरेसा ठरतो. आज गंभीर काही बोलण्यात अर्थ नाही. काहीतरी महाराजांच्या सोईचे बोलावे किंवा दरबार लवकर आवरता येईल असे काही करावे हे त्यांच्या मनी येते. असेही पद्यात बोलणॆ त्यांना पण जड जात होतेच. हा कराचा विषय असाच सोडायचे ते ठरवतात.

प्रधानजी : हो हुकुम महाराज हुकुम

जो हुकुम महाराज हुकुम

महाराज हसतात तसा प्रधानजींचा जीव भांड्यात पडतो.

प्रधानजी : आपल्या नावावर

कला आणि कुसर

महाराजांसाठी लवकर

ढोलकीच्या तालावर

महाराज ढोलकीच्या तालावरचा उल्लेख होताच खूश होतात.

महाराज : काय जाहले आमुच्या राज्यी

कितीक जाहले नर्तक गायक

आम्ही ना भेटलो तयास

कितीएक दिवसात

महाराजांचा पद्य स्टॅमिना संपत आला असावा.

प्रधानजी : जो हुकुम महाराज

हो हुकुम

आपुल्यासाठी करण्या आपली कला पेश

लवकरच येतील ते सोडून आपला देश

थिरकतील पाऊले, वाजतील पैंजणे

व्हावे दंग तुम्ही गायने वादने

आपल्या आनंदाचा नसे कसा पारावर

नाचती साऱ्या जणी ढोलकीच्या तालावर

कर करूनी महाराजांचा गजर

सत्वर होतील महाराजांपुढे हजर

महाराजांचे डोळे लकाकतात. प्रधानजी कोणा कलावंतांस बोलावणे पाठवायचे याचा विचार करावयास लागतात. महाराजांपुढे बोलताना मात्र असे बोलतात जणू सर्व ढोलकीच्या तालावरचा कार्यक्रम ठरलेलाच असावा.

महाराज : शाबास प्रधांजी शाबास

तुमच्यानेच आहे आमचे राज्य हे खास

शाबास प्रधांजी शाबास !

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज

थ्यांकू महाराज

आपल्या कृपेने आम्ही

धन्य जाहलो आज.

थ्यांक्यू महाराज थ्यांक्यू

आपले आयुष्य होवो दीर्घायू

शेवटच्या ओळीचा संबंध आधीच्या ओळींशी नसेलही पण यमक जुळते नि महाराज खूश होतात एवढे प्रधानजींस बास होते. त्यामुळे ते आपली पद्य गाडी पुढे ढकलतात. महाराजांनी लवकर दरबार संपवण्यासाठी ते जेवणखाण्याबद्दल बोलायचे ठरवतात.

प्रधानजी : असेल आपली इच्छा तर

होईल आपली आज्ञा तर

आपल्या मुदपाकात येईल

भात नवा आंबेमोहर

भरपेट होण्या सुवासिक जेवण

करू या भोजन महोत्सवाचे योजन

तृप्त जीभा आणि ढेकर

खाऊनि भात आणि साखर

महाराज खूपच खूश होतात. भाताचे पदार्थ म्हणजे महाराजांच्या तोंडास पाणी सुटणारच. कधी एकदा आपण त्या भोजन महोत्सवात जातो असे त्यांना होते. आपल्या हातातील एयर फेशनरचा महाराज दीर्घ वास घेतात.

महाराज : वा प्रधांजी वा

अहा प्रधांजी अहा

किती काळजी पहा

राज्याची काळजी किती पहा

शाबास प्रधांजी शाबास

तुमच्यानेच आहे आमचे राज्य हे खास

शाबास प्रधांजी शाबास !

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज

थ्यांकू महाराज

आपल्या कृपेने आम्ही

धन्य जाहलो आज.

आतातरी महाराज दरबार बरखास्त करतील असे प्रधानजींना वाटते. पण महाराज आज वेगळयाच मूड मध्ये असतात. आज कोणाला तोफेतोंडी द्यायचा हुकूमही झाला नाही. आज दरबार आताच बरखास्त झाला तर कोणा न कोणाचा जीव वाचेल असे वाटत असतानाच महाराज अजातशत्रूंबद्दल बोलतात.

महाराज : काय समाचार अजातशत्रूंचा

ठीक व्यवहार ना त्यांचा अमुचा?

महाराजांनी कुठून हा विषय काढला आज असे प्रधानजींना वाटते.

प्रधानजी : मारणे आहे आपल्या तिजोरीवर अजूनही डल्ला

नाहीतर करीन म्हणती आपल्यावर हल्ला

टक्के पंचवीस ना पुरती त्यांसी, हवेत म्हणती अजूनी

पाठविती संदेश असा हा त्यांच्या राज्या मधूनी

कोठून हा विषय काढला असे महाराजांना वाटून जाते. हल्ला नि लढाई मध्ये महाराजांचा जीव रमत नाही. काव्य, गायन आणि नर्तनाची त्यांना आवड. त्यात असे रूक्ष विषय येणे त्यांना आवडत नाही. एकाएकी ते पद्य संभाषण विसरतात.

महाराज : सेनापतींस हुकूम द्या, अजातशत्रू आपले वैरी नाहीत. त्यांच्याही राज्याची देखभाल त्यांना करावी लागते. त्यांच्याशी बोला नि ठरवा काय ते. पुढे आम्ही खूपच कामात असणार आहोत, त्यात परत सांस्कृतिक सप्ताह आहे, तुम्ही म्हाणालात तसे कार्यक्रम आहेत. त्यांत व्यत्यय नको.

प्रधानजी सावध असतात. महाराज स्वत: नियम मोडतील तर चालून जाईल पण आपण गद्यात बोलू ते जीव धोक्यात टाकत नाहीत.

प्रधानजी : जो हुकुम जो हुकुम

महाराजांचा जो हुकुम

सावंद्य शिरावर

महाराजांचाच हुकुम

महाराज निर्धास्त होतात. ही भानगड आपल्यापर्यंत आली नाही म्हणजे झाले. प्रधानजी काय तो कर बसवतील आणि देतील वाढीव संरक्षण खर्च अजातशत्रूंना असे वाटून नि:श्वास सोडतात.

महाराज : शाबास प्रधांजी शाबास

तुमच्यानेच आहे आमचे राज्य हे खास

शाबास प्रधांजी शाबास !

प्रधानजी : थ्यांक्यू महाराज

थ्यांकू महाराज

आपल्या कृपेने आम्ही

धन्य जाहलो आज.

महाराज परत त्या एयर फ्रेशनरचा दीर्घ वास घेतात. एकाएकी त्यांना त्या भाताच्या प्रकारांची आठवण येते. महाराजांचा दरबार हा नेहमीच खाण्याच्या आठवणीने संपतो. आज आपण कोणास तोफेतोंडी दिले नाही की हत्तीच्या पायी दिले नाही हे त्यांना आज जाणवत नाही. अजातशत्रूंचा विषय स्वत:च त्यांनी काढला असल्याने त्यांना जास्तच चिडल्यासारखे होते. तातडीने ते दरबार बरखास्त करायचे ठरवतात.

महाराज : दरबारी कामाचा हा ताण

जणु छातीमधील बाण

प्रधांजी थकलो आम्ही खास

करूया दरबार आता बास.

महाराजांच्या तोंडचे शब्द ऐकून प्रधानजी खूश होतात. स्वत:चा तर जीव वाचलाच पण आज कोणालाच शिक्षा झाली नाही याचा त्यांना आनंद होतो. इतर दरबारींना महाराजांनी दरबार बरखास्त केल्याचे कळत नाही. अजून जयजयकार कोणी केला नाही हे पाहून महाराज म्हणतात,

महाराज : प्रधांजी ही दरख्वास्त

करावा दरबार हा बरखास्त

सर्व दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

( ९ )

प्रधानजी आज जरा धास्तावलेलेच असतात. महाराजांच्या मनात काय असावे? मागच्या वेळचे पद्यात बोलणे चालू ठेवायचे की गद्यात बोलायचे? माहित नाही. चुकून महाराजांच्या इच्छेविपरीत घडले तर काही खरे नाही. उगाच जीव जायचा. त्यात परत महत्त्वाची कामे राहिलेली. जीव वाचवायला ते गरजेचे होतेच. शिर सलामत तो दरबार पचास. त्या नादात कसला पत्ता नसताना ते ढोलकीच्या तालावर काय नि खाद्य महोत्सव काय काही बाही बोलून बसलेले. कसलेच आयोजन ना नियोजन. त्यात अजातशत्रूंच्या आक्रमणाचा धोका. आजही पद्यात बोलावे लागले तर. . परत मागच्या वेळी महाराज कोणास तोफेतोंडी द्यायला पण विसरलेले. ते ध्यानात आले तर आज काही खैर नाही. प्रधानजी खूपच अस्वस्थ. महाराज दरबारात येतात.

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य दरबारात येतात. सिंहासनावर बसतात. महाराजांच्या हातात एक एयर फ्रेशनरचा पॅक. त्यावर बाहेरून फुलाफुलांचे चित्र. आज त्यावर गुलाबाच्या फुलांचे चित्र. महाराज त्याचा दीर्घ वास घेतात. त्यांच्या तोंडून आजही वा ! उद्गार निघतो. प्रधानजी विचारात पडलेले. तितक्यात महाराजच बोलतात,

महाराज : सुरू करा दरबार प्रधांजी. आणि गद्यातच होऊ दे. त्या चरणदासाचा जरा परिणाम झाला होता पण आता अजून नको.

प्रधानजी : जशी आज्ञा महाराज.

महाराज : त्या चरणदासास शोधून आणा आणि तुरूंगात टाका. त्याने फक्त आमच्यावर आणि आम्हाला आवडेल अशीच कविता करावी असा आमचा हुकूम आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. सैनिकांस पाठवून आम्ही त्याच्या मुसक्या बांधून त्यास आपल्या समोर हजर करवतो. बाहेर पहारा बसवून त्याच्याकडून आपणास आवडेल असे काव्य लिहून घेतो. सारे काही आपल्या आज्ञेनुसारच होईल महाराज.

महाराज : आम्ही तुमच्यावर खूप खुश आहोत प्रधांजी. तुम्ही म्हणालात त्या सांस्कृतिक सप्ताहाचे काय झाले याबद्दल आम्हाला सांगावे असा आमचा आदेश आहे.

प्रधानजी : जी हुजूर. आपले दूत सर्व कलाकारांस बोलावण्यासाठी रवाना होत आहेत. त्यात दूरदेशीचे सारे कलाकार यायला दोन मास लागतील. त्यानंतर हे आयोजन करावे असा मानस आहे.

प्रधानजी हुशारीने दोन महिन्याचा अवधी मागून घेतात. महाराज थोडे अस्वस्थ होतात पण तसे दाखवत मात्र नाहीत.

महाराज : यावेळी पण एकदम धूमधडाक्यात होऊन जाऊदे प्रधांजी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : बाकी राज्याची हालहवाल कशी आहे प्रधांजी?

प्रधानजी : सारे काही उत्तम. सर्वात प्रथम अजातशत्रूंच्या राज्यातून एक खुशखबर आहे.

महाराज : शेजारील राज्यातून ? आणि खुशखबर?

प्रधानजी : होय महाराज. यावेळी त्यांच्या राज्यातील रस्ते ठिकठिकाणी उखडले गेले आहेत. रस्तोरस्ती खड्डेच खड्डे झाल्याने नागरिक असंतुष्ट आहेत. आपल्या राज्यात मात्र ही समस्याच नाही. कारण आपण अजून रस्ते बांधलेलेच नाहीत. फक्त कर गोळा करणे सुरू केले आहे आपण. रस्तेच नसल्याने खड्ड्यांचा प्रश्नच नाही आपल्या राज्यात. त्यामुळे जनतेचा रोष आपल्याला पत्करावा लागत नाही.

महाराज : प्रधांजी, आम्हाला आपला खूपच आभिमान वाटतो.

प्रधानजी : thank you महाराज. फक्त याचा एक भाग म्हणून अजातशत्रूंना आपल्या कडून अजून काही रक्कम हवी आहे. ती न मिळाल्यास ते आपल्यावर हल्ला करण्याच्या तयारीत आहेत.

महाराज : ते असे करूच शकत नाहीत. आम्ही त्यांना आमचे संरक्षक म्हणून नेमले आहे. आम्ही त्यांना नेमाने संरक्षण भत्ता देत असतो. त्यांना सज्जड दम देणारा खलिता पाठवा. त्यांची गय केली जाणार नाही, हवे तर आमच्या कडून भत्त्याचे पैसे अलग घ्या पण ही युद्ध खोरीची भाषा खपवून घेतली जाणार नाही असे निक्षून बजावा.

प्रधानजी : आपण त्यांना पन्नास टक्क्याने रक्कम वाढवून द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी त्यांनी दक्षिणेकडून रामदेवराजांना हल्ल्याकरता चिथावले असावे असा आमचा अंदाज आहे. रामदेवराजा पण हल्ल्याच्या तयारीत आहेत अशी खबर आहे.

महाराज : मग अजातशत्रू काय हातावर हात धरून बसले आहेत? त्यांनीच आमचे रक्षण करायचे तेच आमच्यावर उलटू पाहत असतील तर आम्ही शस्त्रसंधी मोडून टाकू, त्यांना मिळणारी सारी रक्कम बंद केली जाईल असा इशारा त्यांना देऊन ठेवा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपला आदेश असेल तर सेनापती त्यांच्याबरोबर बोलणी करून कायमस्वरूपी तोडगा काढतील.

महाराज : या साठी आमच्या आदेशाची गरज काय ? सेनापतींना आधीच ही अजातशत्रूंची मनमानी सुरू राहिल याचा धोका दिसायला हवा होता. तो त्यांनी का ओळखला नाही? एवढे दिवस आम्ही या भरवशावर निर्धास्त राहिलो ही आमची चूक झाली. सेनापतींना हजर करा आमच्या समोर.

प्रधानजी घाबरतात. सेनापतीच तोफेतोंडी गेले तर मुश्किल. त्यात राज्यावर दोन्ही कडून संकटे.

प्रधानजी : माफी असावी महाराज, पण सेनापती सीमेवर सैन्याची झाडाझडती घ्यायला गेले आहेत. महाराज, युद्धाची तयारी दाखवून मग तह करावा असा त्यांचा मानस आहे. त्यात आपल्याकडील पैशांची बचत होईल आणि

अजातशत्रूंना पन्नास ऐवजी पस्तीस टक्क्यांचर मानायला भाग पाडता येईल असा सेनापतींचा कयास आहे. त्यासाठी आपली झुरळे नियंत्रणात मग्न असलेल्या सेनेस सीमेवर जाण्याचे आदेश देण्यात यावेत अशी विनंती आपल्याकडे आहे. तसेच तोफाही सीमेवर तैनात कराव्यात असा आदेश आपण दिल्यास युद्धाची तयारी आपण करत असल्याचा इशारा अजातशत्रूंना देता येईल.

महाराज : आपण प्रधांजी जास्तच तयारी करत आहात. आपल्याकडील जहालात जहाल भाषेत खलिता पाठवायची व्यवस्था करा. हे सारे सहन केले जाणार नाही, आमच्याही सहनशक्तीस काही मर्यादा आहेत. आम्ही ठरवल्यास सडेतोड जबाब देऊ आणि आमची सहनशीलता म्हणजे आमची हतबलता नव्हे एवढे निक्षून सांगा त्या खलित्यात. नुसत्या शब्दांच्या बळावर हे करता येईल त्यासाठी सैन्य नि सैनिक कशाला? आणि आपली झुरळ नियंत्रणाची मोहीम त्यामुळे कमजोर होईल याकडे लक्ष असू द्यात. तोफा सीमेवर पाठवल्यात तर न्यायदानात विलंब होईल. असे काही होऊ देऊ नका.

प्रधानजी : जशी आज्ञा हुजूर, आपल्या हुकुमाची तामिली होईल.

महाराज : या समस्येवर अजून एक कायमचा इलाज करता येईल प्रधांजी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : आजच या समस्येचा विचार करायला एक समिती बसवा. चांगले चार सदस्य असू देत त्यात. ते विचार करून आम्हास अहवाल देतील. त्याच्यावर आम्ही विचार करू. मग आपण आपली कृती ठरवू.

प्रधानजी : जशी आज्ञा महाराज. याहून ही मोठी एक समस्या आहे महाराज, आपल्या मंत्रीगणांस महागाईची झळ लागू लागली आहे. त्यांचे भत्ते वाढवावेत.

महाराज : नक्कीच. यासाठी पण समिती नेमली तर चालेल.

प्रधानजी : पण महाराज हे काम तातडीचे आहे. आपणच निर्णय दिलात तर बरे होईल.

महाराज : ठीक आहे. आपल्या तिजोरीत जमा होणारी रक्कम कमी पडत असेल तर थोडा कर वाढवता येईल. लोकांना एक जीवन कर नावाचा कर लावा असे आम्हालाच वाटते.

प्रधानजी : आपल्या आदेशाचे पालन होईल महाराज. आपल्या कल्पनेमुळे राज्यास बरेच उत्पन्न अधिक मिळेल. आपल्या सारख्या महाराजांमुळे आपली प्रजा सुखी आहे.

महाराज : आम्हाला आपला अभिमान वाटतो प्रधांजी. आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : आम्ही मागील काही दिवसात कोणासही तोफेतोंडी दिलेले नाही. आमची न्यायव्यवस्था कमजोर होत आहे का?

प्रधानजी : नाही महाराज, आपल्या राज्यात गुन्हा करण्याची कोणाची हिंमत नाही असा याचा अर्थ आहे.

कोणाचा जीव वाचवल्याचे पुण्य पदरी पडेल असे वाटून प्रधानजी बोलतात. महाराज आज जास्तच चिडलेले. एकतर सर्व सांस्कृतिक कार्यक्रम पुढे ढकललेले, त्यात परत युद्धाच्या बातम्या.

महाराज : खामोश प्रधांजी. आम्ही आज नाराज आहोत. सर्वांवर. ज्या कोणी अजातशत्रूंकडून युद्धाची बातमी आणली त्या शिपायास ताबडतोब तोफे तोंडी द्या. आपली युद्धाची तयारी सेनापती पाहून घेतील. आपण आणि सांस्कृतिक मंत्र्यांनी भोजन सप्ताह नि ढोलकीच्या तालावरच्या आयोजनात लक्ष घालावे असा आमचा हुकूम आहे.

महाराज खूप दिवसांत प्रधानजींवरच डाफरतात.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : आम्ही आज या राज्यकारभाराने शिणलो आहोत. दरबार ताबडतोब बरखास्त करा.

सर्व दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

## ( १० )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य दरबारात येतात. सिंहासनावर बसतात. महाराजांच्या हातात आजही एक एयर फ्रेशनरचा पॅक. त्यावर बाहेरून फुलाफुलांचे चित्र. आज त्यावर मोगऱ्याच्या फुलांचे चित्र. महाराज त्याचा दीर्घ वास घेतात. त्यांच्या तोंडून आजही वा ! उद्गार निघतो. महाराजांना हा एयरफ्रेशनर फारच आवडतो.

महाराज : काय खबरबात प्रधांजी?

प्रधानजी : अजातशत्रूंवर सेनापती. . . .

महाराज : आम्ही त्या साध्या गोष्टींबद्दल नाही बोलत, आपल्या खाद्य महोत्सव आणि कलावंतास उत्तेजना योजनेबद्दल बोलतो आहोत.

प्रधानजी : माफी असावी महाराज. आपल्या कार्यक्रमाच्या आयोजनात कसलीही कसूर राहू नये याची आम्ही काळजी घेऊ. निरोप धाडले आहेत. कलावंत येतच असतील.

या सोयीकरता राज्यात काही रस्ते बनले तर ते लवकर पोहोचू शकतील महाराज.

महाराज : खामोश प्रधांजी, आपल्या शेजारील राज्यातून रस्त्यांच्या खड्ड्यांबद्दलच्या बातम्या आल्या आहेत. आपल्या राज्यात तशी समस्या येऊ नये अशी आमची इच्छा आहे.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. आपले म्हणणे शिरसावंद्य. रस्तेच नसतील तर खड्डे कुठून येणार? आपण म्हणता ते खरे आहे महाराज. पण कलावंतांच्या लवकर पोहोचण्याची व्यवस्था व्हावी म्हणून आम्ही ती योजना मांडत होतो. तरीही महाराजांची गैरसोय होऊ नये म्हणून आपण काही कलावंतांस कायम मुक्कामी ठेवल्यास हा प्रश्न सुटू शकेल. आणि आपला रस्त्यांच्या बांधकामांवरील खर्च ही वाचेल.

महाराज : आपण हुशार आहात प्रधांजी. पण एक आज्ञा आहे, आपला रस्ते कर बंद होऊ देऊ नका.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. महाराज या संदर्भातच एक चांगली बातमी आहे.

महाराज : सांगा लवकर प्रधांजी, खूप दिवसात चांगली बातमी ऐकली नाही आम्ही.

प्रधानजी : शेजारच्या बजबजपुरातून महाराज विचित्रवीर्य यांचा दूत खास संदेश घेऊन आला आहे.

महाराज : काय म्हणतात महाराज विचीत्रवीर्य?

दूत समोर संदेशाची भेंडोळी घेऊन उभा. महाराजांना वाकून नमस्कार करतो. काही बोलायला तो तोंड उघडणार तोच प्रधानजी त्याच्या हातातून ती संदेशाची भेंडोळी घेतात.

महाराज : वाचा, प्रधांजी.

त्या दूताचा जीव वाचवल्याचे समाधान प्रधानजींना वाटते.

प्रधानजी : महाराज विचित्रवीर्य लिहितात,

राजमान्य राजेश्री चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य यांसी,

सादर प्रणाम !

आपल्या राज्यातून खबर मिळत असते की आपण नवनवीन करांची योजना करीत असता, त्यामुळे आपले राज्य प्रगती पथावर आहे. आपल्या राज्यातील प्रजा या सर्वात सहभागी असते. अमीरांस अमीर बनवणारे नि गरिबांस हटवणारे कल्याणकारी राज्य बनवण्यात आपले राज्य अग्रेसर आहे. पथ कर, हवा कर, पाणी कर, जीवन कर असे नावीन्यपूर्ण कर आपण आपल्या राज्यात लागू करून आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी आम्ही आमच्या राज्यातून काही जणांचे शिष्टमंडळ पाठवू इच्छितो. म्हणजे आमच्या राज्यातही अशा करांचे नियोजन करता येईल. आपली परवानगी असल्यास हे शिष्टमंडळ पुढील महिन्यात येऊ शकेल.

आपला,

महाराज विचित्रवीर्य

महाराज : प्रधांजी, आज आम्ही खूपच खूश आहोत. या दूतास आपण आपल्या गळयातील हार द्यावा अशी आमची आज्ञा आहे.

प्रधानजी सावध असतात. मागच्या वेळी त्यांच्या गळयातीत हार द्यायला लावल्यानंतर हल्ली ते गळयात हार घालत नाहीत. त्यांचा हात स्वत:च्या गळयाकडे जातो.

महाराज : तुमच्या कडे नसेल तर तुमच्या शेजारील सांस्कृतिक मंत्र्यांच्या गळयातील हार देऊन पाठवा या दूतास. त्यांच्या शिष्ट मंडळास आग्रहाचे निमंत्रण धाडा त्याच्या सोबत. आज खरेच आम्हाला आमच्या मंत्रिमंडळातील रत्नांचा अभिमान वाटतो आहे प्रधांजी.

प्रधानजी : thank you महाराज.

दूत हार घेऊन महाराजांना वाकून नमस्कार करति आणि निघून जातो.

महाराज : प्रधांजी आज आम्ही खूपच खूश आहोत. आपल्या राज्याची कीर्ती खरेच दूरवर पोहोचत आहे. आम्हाला याचा अभिमान वाटतो. आपण आमचे प्रधांजी आहात म्हणूनच आम्ही सुखाने राज्य करीत आहोत.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : या खुशीच्या मौक्यावर काही दानधर्म करावा असे आम्हास वाटते आहे.

सार्‍या दरबार्‍यांचे हात आपापल्या गळयातील दागिन्यांकडे जातात.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपण म्हणाल तसेच होईल महाराज.

महाराज : आपल्या राज्यातील गरीबांस हे दान द्यावे अशी आमची आज्ञा आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : सर्व प्रथम आपल्या राज्यातील सर्वाधिक कर चुकविणाऱ्यांची नावे आम्हास द्या. त्यांचा सर्व कर आम्ही स्वत: माफ करून त्यांचा सन्मान करू. या शिवाय आपल्या राज्यातील शंभर गरीब श्रीमंतांची यादी आपण सादर करावी.

प्रधानजी गोंधळतात.

महाराज : प्रधांजी, आपल्या राज्यात काही अमीर असे आहेत की त्यांना काही काही सुविधा परवडत नाहीत. काहींना दारी हत्ती झुलवणे परवडत नाही, काहींना विमानोड्डाणाचे सुख नाही. काही तर असे आहेत की त्यांना आपल्याकडील काही पंधरावीस नोकरांवर अवलंबून राहावे लागते, त्यांना अजून नोकरांस पदरी ठेवणे जमत नाही. काही फक्त पंचपक्वानांचेच जेवण जेवतात त्यांना कांदाभाकरी खाऊ म्हटले तरी ते जमत नाही. काहींना आपल्या घरातील मऊ गाद्यांवर नीट झोप लागत नाही. असे आणि यासारखे गरीब असतील तर त्यांना मदत करणे या राज्याचे कर्तव्य आहे असे आम्हाला वाटते. या सर्वांस मदत कशी करावी याचा आराखडा बनवा आणि आम्हास सादर करा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपले राज्य कल्याणकारी आहे हे सर्व जगच म्हणूनच म्हणते. त्रिखंडात आपल्या कीर्तीचा सुगंध म्हणूनच पसरला आहे. आपल्या हृदयी गरीबांप्रती जी कणव आहे त्याचे गुणगान जग करीत असते. न्यायदानाबद्दल तर सातासमुद्रापलिकडे आपण मशहूर आहात.

या सर्व प्रकारात कदाचित आपलाही नंबर लागावा या आशेने प्रधानजी महाराजांच्या तारीफेचे पूल बांधू लागतात.

महाराज : लवकरात लवकर या हुकुमाची अमंलबजावणी व्हावी असा आमचा हुकूम आहे.

प्रधानजी : लवकरच आपला वाढदिवस आहे त्याबद्दल आपण हे सर्व जाहीर करावे असे आम्हाला वाटते.

महाराज : वा ! प्रधानजी आम्हाला तुमचा अभिमान वाटतो. जाता जाता अजातशत्रूंबद्दल सांगावे काय झाले ते.

प्रधानजी : होय महाराज. आपल्या हुकुमावरून सेनापतींनी त्यांचा बंदोबस्त केला आहे. त्यांना त्यांचा हिस्सा देण्याची तयारी दाखविल्यावर युद्धाची शक्यता नाहीशी झाली आहे. रामदेवराजांनीही आपले सैन्य माघारी घेतले आहे.

महाराज : आम्ही आपणास हाच आदेश देत होतो. आपली झुरळे नाश मोहीम खंड पडू न देणे जास्त महत्त्वाचे आहे.

प्रधानजी : जी महाराज.

महाराज : आणि आमच्या न्यायदानाबद्दल ? आज कोणास पकडले आहेत तुम्ही?

प्रधानजी गोंधळून पाहातात. महाराजांनी कोणास पकडण्यास सांगितल्याचे त्यांना आठवत नाही. आज त्या दूतास बोलू दिले असते तर कदाचित हा प्रसंग ओढवला नसता असे त्यांना वाटून जाते. तितक्यात महाराजच म्हणतात,

महाराज : आज ह्या खुशीच्या प्रसंगी सर्व गुन्हेगारांची शिक्षा माफ.

प्रधानजी : म्हणजे सर्वांस सोडून द्यावे असा हुकूम आहे महाराजांचा?

महाराज : प्रधांजी, आम्ही असा हुकूम देऊ शकतो का? आजच्या दिवशी ज्यांना ही शिक्षा होणार होती त्यांना माफी द्यावी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : आज आम्ही खूपच खूश आहोत. या आनंदात आजचे कामकाज इथेच थांबवावे असा हुकूम आम्ही देत आहोत. दरबार बरखास्त.

सर्व दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

( ११ )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा होशियार. राजाधिराज लोकहृदयसम्राट चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. त्यांच्या हातात एक न पेटवलेली अगरबत्ती आहे. महाराज ती नाकाशी धरून तिचा दीर्घ वास घेतात.

महाराज : काय खबरबात प्रधांजी ?

प्रधानजी : आपल्या कृपेने उत्तम आहे महाराज. सर्वत्र शातंता आहे. तिजोरी भरलेली आहे. आपल्या कीर्तीचा सुगंध सर्वत्र दूरदेशी पसरलेला आहे.

महाराज खूश होतात.

प्रधानजी : आपल्या पर्यावरण मंत्र्यांची एक खास विनंती आहे महाराज. अभय असल्यास आपणास सादर विनंती करायची आहे.

महाराज : आपणास नेहमीच अभय असते प्रधांजी.

प्रधानजी : आणि पर्यावरण मंत्र्यांसही अभय असेल तर. .

महाराज : होय. आपण बेलाशक सांगावे.

प्रधानजी : जशी आज्ञा हुजूर. पर्यावरण मंत्रालयाने प्रदूषणाचा नव्याने अभ्यास केला आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासात असे दिसले आहे की तोफांच्या वापराने आवाज आणि वायू प्रदूषण होत आहे. त्यामुळे तोफांऐवजी कडेलोटाची

शिक्षा देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त तोफगोळयांच्या खर्चात बचत होईल ती वेगळीच.

महाराज : थांबा प्रधांजी. प्रधांजी, अशी हिंमत कोणाची होऊच कशी शकते? आम्ही अभय देण्याचे वचन दिले म्हणून नाहीतर. . . आपणास हे ध्यानात घेतले पाहिजे की आपण आपल्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी अजातशत्रूंकडे दिलेली आहे. असे असताना आपण तोफांचा वापर केला नाही तर त्यांना गंज चढेल. त्यामुळे त्या नित्य वापरात ठेवण्यास हाच एक उपाय आहे.

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. आपणास या विषयाचा असा त्रास होईल अशी कल्पना आम्हास आली नाही. पर्यावरणमंत्र्यांच्या वतीने आम्ही त्रिवार क्षमा मागतोच पण यापुढे असला काही अभ्यास करू नये असेही आदेश आम्ही त्यांना देतो.

महाराज : ठीक आहे. आपल्या राज्यातील न्यायदानात कोणताही हस्तक्षेप होऊ देऊ नका हा आमचा स्पष्ट आदेश आहे.

प्रधानजी : जो आज्ञा महाराज. या शिवाय आपल्या राज्यात मच्छरोद्भव रोगांचा प्रसार वाढत आहे असे आरोग्यखात्यास दिसले आहे. हिवताप आणि एक डेंगू नावाच्या तापाने लोकांना अंथरूण धरण्यास भाग पडत आहे. कित्येक जण मृत्युमुखी पडत आहेत. या रोगांचे प्रमाण चिंताजनक असल्याचे आपल्या वैद्यराजांचे म्हणणे आहे.

महाराज : ते ठीक आहे पण यावर उपाय सुचवा. नुसतीच समस्या सांगू नका.

प्रधानजी : जी महाराज. सध्या आपले नागरिक झुरळ निर्मूलात मग्न आहेत. आजवर एकसष्ट लाख एकावन्न हजार एकशे एकोणनव्वद झुरळे मारली गेली आहेत. त्यामुळे सध्या मच्छर निर्मूलन शक्य दिसत नाही. त्यामुळे या व्याधींवर काही उपाय सुचविले आहेत. आपली आज्ञा असेल तर. .

महाराज : बोला प्रधांजी.

प्रधानजी : जी हुजूर. विविध ठिकाणी डासांना चावण्यास मनाई करणारे फलक लावण्यात यावेत अशी योजना आहे. डासांना मानववस्तीत येण्यास बंदी घालण्यात यावी असा कायदा करण्यात यावा. त्यांनी माणसास चावणे बेकायदा घोषित करावे. ज्या कोणा नागरिकास जिवंत डास दिसेल तो त्यांनी पकडून आपल्या मंत्रालयात आणून दिल्यास त्या डासांचा कडॆलोट करण्यात यावा. किंवा त्यांना बंदुकीने वा तरवारीने मारण्यात यावे अशा या योजना आहेत. आपला हुकूम असल्यास यांची अंमलबजावणी होईल.

महाराज : आपल्या वैद्यराजांचा आम्हांस अभिमान वाटतो. झुरळ निर्मूलनानंतर डासांचा नायनाट करण्यात येईल असा इशारा सर्व डासांस आतापासून देऊन ठेवावा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : आमच्याकडे अजून एक जालिम उपाय आहे. त्याची पण सक्त अंमलबजावणी व्हावी. आजपासून हिवताप आणि तो डेंगू की फेंगू यांची नावे बदलण्यात यावीत. त्यांना दुसऱ्या कोणत्यातरी नावाने संबोधले तर या रोगाने होणारे मृत्यू टाळता येतील. तसे आदेश आरोग्य खात्यास देण्यात यावेत.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. तातडीने हे नावबदलाचे निर्देश देण्यात येतील.

महाराज : प्रधांजी, आम्हाला तुमचा अभिमान वाटतो.

प्रधानजी : thank you महाराज. आपल्या राज्याच्या दौऱ्यावर विचित्रवीर्य महाराजांचे पथक येऊन गेले आहे. त्यांना आपल्या राज्यातील करसुधारणांचा अभ्यास करायचा होता. विचित्रवीर्य महाराज आपल्या

कर्तृत्वाने अत्यंत प्रभावित झाले आहेत. त्यांनी आपल्या बजबजपुरातही ह्या करसुधारणा अंमलात आणायचे ठरवले आहे.

महाराज : आम्ही आज खूपच खूश आहोत.

प्रधानजी : या बरोबरच आपल्या कीर्तीचा सुगंध किती दूरवर पसरला आहे हे सांगणारी घटना घडली आहे. उत्तरेतील सुलतानखंडाचे बादशहा जहांपन्हा किताबुद्दीन यांना ही आपल्या राज्यातील कररचनेचा अभ्यास करण्यासाठी शिष्टमंडळ पाठवायचे आहे. असा संदेश घेऊन त्यांचा खास दूत आला आहे. त्यांच्या संदेशानुसार सुलतानखंड हा एकच मोगलाईसाठी प्रसिद्ध देश होता पण आज आपल्या राज्याने त्याच्यापुढे मजल मारली आहे. आणि याशिवाय आपण सर्वधर्मीयांवर कर आकारणी करून सर्वधर्म समभावाचा आदर्श ही घालून दिला आहे.

महाराज : आम्ही आज खूपच खूश आहोत. आम्हाला आमच्या मंत्रीरत्नांचा अभिमान वाटतो आहे.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज : प्रधांजी, त्या जहांपनाह शब्दाचा अर्थ आपणास ठाऊक आहे का?

प्रधानजी : होय हुजूर. या शब्दाचा अर्थ आहे सर्व जगास सांभाळणारा. याशिवाय आलमगीर आणि शहेनशहा असेही म्हटले जाते त्यांच्या बादशहास.

महाराज : प्रधांजी, आमचा आदेश आहे, आमच्या आगमनाच्या घोषणेत आजपासून या शब्दांचा वापर करा.

प्रधानजी : जी हुजूर, तशा सूचना आम्ही दरबार मंत्र्यांस देतो. उद्यापासूनच याची अंमलबजावणी होईल.

महाराज : नाही प्रधांजी, उद्या नव्हे तर आता पासूनच. आम्ही आता बाहेर जाऊन परत येतो. आमच्या आगमनाची नवीन घोषणा करा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

काही कळायच्या आत महाराज उठून दरबाराबाहेर जातात. आपल्या महालापर्यंत फिरून यावे म्हणून निघतात. इकडे प्रधानजींची धावपळ. काही चूक झाल्यास भालदार चोपदार तोंफेतोंडी जायचे. काही वेळातच महाराज परत येतात.

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा. जहांपनाह, आलमगीर, शहेनशहा लोकहृदयसम्राट राजाधिराज चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

नवीन घोषणा होते. महाराज प्रसन्न मुद्रेने दरबारात प्रवेश करतात. सिंहासनावर बसतात. त्यांच्या हातातील अगरबत्ती त्यांनी पेटवून घेतली असते. त्याचा धूर येताना सर्वांना दिसतो. महाराज त्या अगरबत्तीचा वास घेतात आणि खूश होतात.

महाराज : प्रधांजी, पुढील कारवाई सुरू करा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आमची अशी दरख्वास्त आहे की आपण बजबजपुराच्या पुढे असावे. याकरता आपल्याकडे नवीन पाळीव प्राणी कराची सूचना आहे. यात गाय, बैल, पोपट, घोडे, गाढव ज्यांच्या घरात असतील त्यांच्या कडून तसेच ज्यांच्या घरात पाली, कुत्रे, मांजरी असतील व ज्यांच्या घराच्या अंगणात चिमण्या, कावळे, मैना असे पक्षी बसत असतील त्यांच्या कडून हा कर घेतला जाईल. यामुळे राज्याच्या उत्पन्नात भर पडेल.

महाराज : वा! प्रधांजी, आम्हाला आमच्या मंत्र्यांचा खरेच खूप अभिमान वाटतो. आम्ही म्हटले तसे आमचे हे मंत्री म्हणजे रत्ने आहेत.

प्रधानजी : thank you महाराज.

महाराज खूश होऊन अगरबत्ती नाकाजवळ घेऊन जातात आणि जोरात कळवळतात. अगरबत्तीच्या जळत्या टोकाचा चटका लागून आपले नाक हाताने पकडून धरतात.

महाराज : प्रधांजी, आम्ही गंभीररीत्या घायाळ आहोत. आजचा दरबार इथेच बरखास्त करा. त्या आधी ज्या काडीने आमचे नाक भाजले ती काडी ज्या कारखान्यात बनली तेथील ही काडी बनविणाऱ्या कामगारास तोफेतोंडी द्या. तोफेतोंडीच द्या, कडेलोट नाही. हा आमचा स्पष्ट आदेश आहे. आणि जाण्याआधी तुमचे ते लाख आणि पोशिंद्याचे वाक्य म्हणा. मग आम्ही आमच्या गंभीर जखमेवर उपचार सुरू करतो.

प्रधानजी : जी महाराज, लाख मेले तर चालतील पण लाखांचा पोशिंदा मरायला नको.

महाराज : दरबार बरखास्त.

सर्व दरबारी : जहांपनाह, आलमगीर, शहेनशाह लोकहृदयसम्राट राजाधिराज चक्रवर्ती चक्रमादित्य महाराज की जय.

( १२ )

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा. जहांपनाह, आलमगीर, शहेनशहा लोकहृदयसम्राट राजाधिराज चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. त्यांच्या हातात एक छोटा बोर्ड आहे त्यावर 'हे फूल आहे' असे लिहीलेले. महाराजांच्या नाकावर विदूषकाच्या डोक्यावर टोपी घालतात तसे शंकूच्या आकाराचे बॅंडेज बांधलेले. महाराजांच्या चेहऱ्यावर आजारीपणाचा भाव.

महाराज : प्रधांजी आम्ही गंभीररीत्या जखमी झालो होतो तेव्हा तुम्ही हे राज्य नीट सांभाळलेत. आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. जरा तो लाखांचा पोशिंदा वाला डायलॉग बोला मग आपण कामकाज सुरू करू.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. लाख मेले तर चालतील पण लाखांचा पोशिंदा जाता नये. चरणदासांकडून आम्ही यावर चार ओळी लिहून घेतल्या आहेत. चरणदासांनी हल्ली काव्य करणे सोडले आहे म्हणाले ते, आम्ही त्यांच्या डोक्यावर बंदूकीची नळी ठेऊन हे लिहून घेतले आहे, आपली आज्ञा असेल तर आम्ही पेश करू.

महाराज : बोलावे प्रधांजी.

प्रधानजी : आकाशी परिंदे

धरित्री दरिंदे

महाराज तुम्ही

लाखांचे पोशिंदे

अशा त्या चार ओळी आहेत.

महाराज : आम्ही फार प्रसन्न आहोत. चरणदासांना आज्ञा आहे की अजून काव्य प्रसवा. जर शक्य नसेल तर त्यांच्यावर दंडाचा प्रयोग करा.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या आज्ञेनुसार आपल्या राज्यात कला साधना करण्याची सक्ती कलावंतावर करण्यात येईल. आपल्याला आवडेल अशीच आणि तितपतच कलासाधना करण्याचे आदेश त्यांना देण्यात येतील. या निमित्ताने आपल्या राज्यातील सांस्कृतिक धोरण ठरवण्यात येणार असून आपल्या मार्गदर्शनाची त्यास गरज आहे महाराज.

महाराज : बोलावे प्रधांजी. काय प्रस्ताव आहेत?

प्रधानजी : आपल्या सांस्कृतिक मंत्र्यांनी याबाबत काही सूचना केल्या आहेत. त्या अशा की, कोणतीही कला सादर करताना त्यात महाराजांचा उल्लेख होणे गरजेचे आहे, म्हणजे एखादे निसर्ग चित्र असेल तर आपण त्या चित्रात त्याकडे पाहात आहात किंवा कोणतीही कविता किंवा कथा लिहीली तर त्यातही महाराजांचा उल्लेख आवश्यक आहे. कॊणी यात कुचराई केली तर त्यांना कडक शिक्षेची तरतूद असेल. याशिवाय कवी, लेखक, चित्रकार, गायक, नर्तका वगैरेंनी काही विशिष्ट प्रमाणात कलानिर्मिती केलीच पाहिजे असाही नियम करावा. तसेच कोणत्याही प्रकारे महाराजांचा अवमान त्यात सहन केला जाणार नाही, म्हणजे एखाद्या कलाकाराने आपले चित्र काढले व त्यात आपली ओळखच पटत नसेल वा

आपल्या चेहऱ्यावरचे हास्य नीट दिसत नसेल तर कडक शिक्षा दिली जाईल. याशिवाय कलासंवर्धनाचा भाग म्हणून आपल्या राज्यातील सर्व नर्तिकांना आपल्या राजधानीजवळच राहण्याचे महाल देण्यात यावेत म्हणजे त्या महाराजांच्या सोयीनुसार हजर होऊ शकतील. अशा त्या सूचना आहेत.

शेवटची सूचना ऐकून महाराज खूश होतात. ही सूचना प्रधानजींनीच आपल्या जावयास म्हणजे सांस्कृतिक मंत्र्यांस सुचविली असते.

महाराज : आम्ही खूश आहोत प्रधांजी, सांस्कृतिक मंत्र्यांस आपण एक मोत्यांचा हार बक्षिस म्हणून द्या.

जो तो आपल्या गळ्याकडे हात नेतो. आजकाल गळ्यात कोणीच दागिने घालत नाहीत. दरबारात पहाऱ्यावर एक सैनिक असतो, त्याच्या गळ्यात चुकून राहिलेली सोन्याची साखळी काढून सांस्कृतिक मंत्र्यांस दिली जाते. प्रधानजींना टेन्शन, चुकून आज आपले जावईबापू thank you बोलणार तर नाहीत. तसे काही होत नाही आणि आपली मुलगी विधवा होणार नाही म्हणून प्रधानजींचा जीव भांड्यात पडतो. महाराज आपल्या ढोलकीच्या तालावरच्या स्वप्नात रंगतात. प्रधानजी हुशारीने काही वेळ काहीच बोलत नाहीत. थोड्यावेळाने महाराज भानावर येतात.

महाराज : पुढचे कामकाज सुरू करा प्रधांजी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आपल्या राज्यातील सामाजिक विभागाने आपल्या राज्यातील प्रगतीचा आढावा घेण्यासाठी माहिती गोळा केली आहे. ती आज्ञा असेल तर आपल्या समोर सादर करायची आहे.

महाराज : सांगा प्रधांजी, आपल्या राज्याची प्रगतीपथावरील वाटचाल ऐकण्यास आमचे कान आतुरलेले आहेत. गेले काही दिवस आम्ही आमच्या गंभीर इजेमुळे विश्रांती घेताना आमच्या प्रजेचाच विचार करत होतो. सर्व कर हसत हसत भरणारी आपली जनता आम्हाला सर्वात प्रिय आहे. बोला काय आहे तो अहवाल ?

प्रधानजी : जो हुकूम महाराज. सामाजिक विभागाने राज्यातील जनतेच्या स्थितीची पाहणी केली आहे. त्यात चाळीस टक्के जनता दिवसात एकदा जेवते, दहा टक्के दोन वेळा जेऊ शकते. दोन ते तीन टक्क्यांच्या घरी अन्न उरते ते सुबत्तेचे लक्षण समजून ते फेकून देतात. बाकी राहिलेले अठ्ठेचाळीस टक्के काही दिवसात एकदा जेवतात. याशिवाय राज्यातील तीस टक्के मुले वजनाने ठीक म्हणता येतील अशी आहेत तर बाकी अत्यंत बारीक आहेत. शाळेत जाणारी मुले एकूण पंचावन्न टक्के आहेत, लिहीता वाचता येणाऱ्या लोकांची संख्या एकूण पस्तीस टक्क्यांवर आहे. राज्यात एक ही रस्ता अजून नाही. राज्यात पाण्याची घरपोच सोय दहा टक्क्यांच्या घरी आहे आणि पिण्याच्या पाण्याची घराजवळ सोय पंचवीस टक्क्यांना आहे.

महाराज ऐकता ऐकता रागावतात. प्रधानजींचे त्यांच्याकडे लक्ष नाही. त्यामुळे ते वाचत राहातात. एरव्ही प्रधानजींनी वाचताना भाषा तरी बदलली असती पण यावेळी त्यांना काय झाले कोणास ठाऊक जसा अहवाल आहे तसाच वाचत राहतात. तेवढ्यात न राहवून महाराज ओरडतात

महाराज : खामोश प्रधांजी, एक शब्द ही पुढे बोलू नका.

प्रधानजी दचकून गप्प बसतात नि महाराजांकडे पाहू लागतात.

महाराज : आता आमच्या हुकुमांकडे लक्ष द्या. सामाजिक विभागाचे आकडे काय आहेत याची आम्हाला पर्वा नाही, आम्ही सांगतो तसे आकडे लिहा. एक एक सांगा, आम्ही सांगू ते आकडे अहवालात घाला आणि तेच त्यांचे अधिकृत आकडे असतील अशी आमची आज्ञा आहे.

प्रधानजी : (त्यांच्या आवाजात कंप आहे, प्रथमच ते आज घाबरतात ) जो हुकूम महाराज.

महाराज : सांगा एक एक करून

प्रधानजी : एकदा जेवणारी जनता

महाराज : शंभर टक्के लिहा, पुढे बोला प्रधांजी.

प्रधानजी आपल्या अहवालात तसा बदल करत जातात.

प्रधानजी : दोन वेळा जेवणारे

महाराज : ऍंशी टक्के

प्रधानजी : होय महाराज, काही दिवसात एकदाच जेवणारे

महाराज : एक टक्का लिहा.

प्रधानजी : शाळेत जाणारी मुले. .

महाराज : सत्त्याऍंशी टक्के

प्रधानजी : जी महाराज. वजनाने कमी

महाराज : ऍंशी टक्के आणि शाळेत जाणारी नव्वद टक्के

प्रधानजी : होय हुजूर,

महाराज : आणि खड्ड्यांची संख्या राज्यात शून्य टक्के, लिहीता वाचता येणारे ऍंशी टक्के, पाण्याची सोय पन्नास टक्के, प्रधांजी हे आकडे असेच हवेत आम्हाला. आमचा अजून एक आदेश आहे, आपल्या राज्यात जागोजाग पाट्या लावा की सर्व जनता सुखी आहे आणि समाधानी आहे. याबाबतीत कोणतीही हयगय होऊ नये. तशा दवंड्या पण रस्तोरस्ती पिटा. जनतेला आदेश द्या की ती सुखी आहे.

प्रधानजी : जी हुजूर आजच आम्ही सामाजिक विभागास असे आदेश देतो.

महाराज : आणि सामाजिक विभागातील ज्या कारकुनाने ही सर्व पाहणी लिहून काढली त्या कारकुनास ताबडतोबीने तोफेतोंडी द्या, याबाबतीत वेटींग लिस्ट वरच्यांना थांबू द्या आणि त्या कारकुनास तोफेतोंडी द्या.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : प्रधांजी, आता आम्हाला अत्यंत शिणवटा आलेला आहे. आताच आम्ही जिवावरच्या दुखण्यातून सावरत आहोत. आम्ही हा दरबार बरखास्त करत आहोत.



सर्व दरबारी : जहांपनाह, आलमगीर, शहेनशाह लोकहृदयसम्राट राजाधिराज चक्रवर्ती चक्रमादित्य महाराज की जय.

(१३)

ऐका हो ऐका. बा अदब बा मुलाहिजा. जहांपनाह, आलमगीर, शहेनशहा लोकहृदयसम्राट राजाधिराज चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य पधार रहे हैं. निगाह रखो.

महाराज चक्रमादित्य येतात आणि सिंहासनावर बसतात. दरबारातील सर्व त्यांना वाकून सलाम करतात. महाराजांच्या हातात एक छोटी अत्तराची कुपी आहे. नाकावर क्रॉस सारखी पट्टी. तोंडावर अगदी जिवावरच्या दुखण्यावरून उठल्याचे भाव. नाकाने महाराज त्या अत्तराच्या कुपीचा दीर्घ वास घेतात.

महाराज : काय प्रधांजी, काय हालहवाल राज्याची?

प्रधानजी : आपल्या कृपेने उत्तम आहे सर्व महाराज. सगळीकडे आबादी आबाद आहे. सगळे सुखी आणि आनंदात आहेत. तसे फलकच आम्ही राज्यभरात लावून टाकले आहेत. त्यामुळे आपल्या आज्ञेनुसार सर्व प्रजा सुखीच आहे. आणि आपली तिजोरी भरलेली असल्याने आपण ही सुखी आणि आनंदात आहोत. एकूण सर्वत्र कुशल आहे.

महाराज : आम्ही खूपच खूश आहोत प्रधांजी. आम्ही आपल्यावर अत्यंत प्रसन्न आहोत. आपण आहात म्हणून आम्ही सुखाने राज्य करत आहोत.

प्रधानजी : thank you  महाराज. याहून ही चांगल्या बातम्या आहेत महाराज.

महाराज : सांगा, सांगा प्रधांजी. चांगल्या बातम्या ऐकायला आमचे कान आतुर झाले आहेत. आम्हाला आमचाच अत्यंत अभिमान वाटतो आहे.

प्रधानजी : महाराज आपली तिजोरी भरलेली आहे. आता कररूपाने आलेल्या मुद्रा ठेवायला जागा न पुरल्याने नव्या तिजोऱ्या आणाव्या लागत आहे ही एक खर्चाची बाब सोडली तर अर्थव्यवस्था अगदी बाळसे धरू लागली आहे. याशिवाय संपूर्ण राज्यात एकही खड्डा नसलेले आपले राज्य म्हणून आपली कीर्ती पसरत आहे. नवनवीन करांच्या बद्दल अभिनंदनाचे संदेश दुसऱ्या राज्यांतून येत आहेत. एकूणच भूपती म्हणून या राज्याच्या भूमीवर पाऊल ठेवण्यासाठीही जनतेला भराव्या लागणाऱ्या कराबद्दल इतर देशांतील राजांना आपला हेवा वाटत आहे असा आमचा अंदाज आहे.

महाराज : आज प्रधांजी, तुम्ही आमचे कान तृप्त करून टाकले आहेत. आम्ही खूपच खूश आहोत.

प्रधानजी : महाराज, आपल्या अर्थविभागाने आजवर वेगवेगळे कर सुचवले आहेत. त्यानुसार आपण कर गोळा करत आहोत. त्यानुसार तिजोऱ्या भरणे, हिशेब ठेवणे, करचुकारांवर नजर ठेवणे वगैरेंवर आपला वेळ जात आहे नि मेहनत लागत आहे. तसेच अतिरिक्त खर्चही आपला यावर होत आहे. यावर उपाय म्हणून एक कर संकलन कर लागू करण्याची सूचना आहे. त्यातून या करसंकलनाच्या अतिरिक्त कामावरही नजर ठेवता येईल अशी सूचना आहे.

महाराज : वा ! प्रधांजी, उगीच नाही आम्ही म्हणत की आमचे मंत्री अगदी रत्नं आहेत. आम्हांला सर्वांचाच अभिमान वाटतो. आपल्याला तिजोरीची व्यवस्था

अपुरी पडत असेल तर अतिरिक्त मुद्रा पगारवाढीच्या रूपात आमच्या मंत्रीगणांत वाटाव्या अशी आमची आज्ञा आहे.

दरबारी मंत्री खूश होतात. प्रधानजी आपली खुशी लपवत म्हणतात,

प्रधानजी : thank you, महाराज. या शिवाय महाराज, कर्जमाफीबद्दल शंभर अर्ज आलेले आहेत. त्यातील एकोणनव्वद सामान्य शेतकऱ्यांचे आहेत. त्यांचा करभरणा काही हजार मुद्रांचा आहे. यावर्षी पाऊस कमी पडल्याने पीकपाणी कमी झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

महाराज : आणि बाकी अकरा?

प्रधांजी : आपल्या राज्यातील मोठ्या उद्योगपतींचे अर्ज आहेत महाराज. त्यांनी आपापल्या उद्योगांकरता कर्जे घेतली होती आपल्याकडून. पण अपेक्षित नफा न मिळाल्याने व्याजाची रक्कम माफ करावी अशी त्यांची विनंती आहे.

महाराज : हे उद्योगपती आपल्या राज्याचे भूषण आहेत. त्यांनी काही लाख मुद्रांचा कर भरला नाही तरी त्यांच्यावर आपले राज्य चालते. त्यांनी व्याज माफी मागितली असेल तर आपण त्यांना तीच नाही तर मूळ कर्जही माफ करून टाकू असा आमचा आदेश आहे.

प्रधानजी : हाच न्याय शेतकऱ्यांना. . .

महाराज : प्रधांजी, आपण एवढी वर्षे इथे आहात, आपणास आम्ही न्यायाची पायमल्ली करताना पाहिले आहे का? शेतकऱ्यांस सांगा अशा कर्ज माफीने

सरकार चालवावे कसे आम्ही? पाऊस पडणे न पडणे आमच्या हातात नाही. त्यांच्याकडून कर्जवसूली झालीच पाहिजे. शिवाय बाकी शेतकरी नेकीने कर भरत असताना यांच्याकडून तसे न झाल्यास बाकीच्यांवर अन्याय होईल. आम्ही काहीही सहन करू पण अन्याय आमच्या राज्यात होऊच शकत नाही.

प्रधानजी : शेतकरी म्हणतात की त्यांची अवस्था दयनीय आहे. त्यांना महाराजांनी हात न दिला तर त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येईल.

महाराज : प्रधांजी, ही आत्महत्येची धमकी त्यांनी देऊ नये अशी समज त्यांना द्या. पुन्हा अशी करमाफी आणि कर्जमाफीची वेळ आली तर आम्हीच त्यांना तोफेतोंडी देऊन त्यांचा आत्महत्येचा त्रास वाचवू असा इशारा देऊन ठेवा.

प्रधानजी : जी हुजूर. जशी आपली आज्ञा महाराज. आपल्या राज्याची ख्याती करसुधारणांसाठीच नव्हे तर न्यायदानासाठीही आहे देशोदेशी महाराज.

महाराज : तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे प्रधांजी.

प्रधानजी : आपली आज्ञा असेल तर आपल्यासमोर एका नवीन कवीच्या चारओळी याबाबतीत ऐकवू इच्छितो महाराज.

महाराज : जरूर प्रधानजी. पण एकच खबरदारी घ्या, जे काव्य ऐकवाल ते आम्हाला रूचले नाही तर त्या नवकवींचा कडेलोट केला जाईल.

महाराज तोफेतोंडीच्या ऐवजी कडेलोट म्हणतात म्हणून प्रधानजी खूश होत्ताहोता चिंतीत होतात, एखादे कवीहत्येचे पातक आपल्या हातून घडते का याची

भीती त्यांना वाटते. त्यातून हा कवी त्यांच्या मुलाचा जवळचा मित्र. महाराजांना न आवडल्यास दुसऱ्या कोणास कवी म्हणून उभे करू, पण तरी कोणाच्यातरी हत्येचे पातक घडू नये म्हणून प्रधानजी टेन्शन मध्ये.

प्रधानजी : कविराज म्हणतात,

चक्रमपुरी नाचे

ढोलकीच्या तालावर

देशोदेशी कीर्ती

महाराजांच्या न्यायावर

महाराज ढोलकीच्या तालावरचा उल्लेख ऐकून महाराज खूश होतात. परत महाराजांच्या न्यायदानाचा उल्लेख.

महाराज : वा ! प्रधांजी आम्ही खूप खूश आहोत.

प्रधानजी कोणाचातरी जीव आपणामुळे गेला नाही म्हणून खूश होतात.

प्रधानजी : एक गंभीर प्रश्न समोर येतोय महाराज.

महाराजांच्या चेहऱ्यावर चिंता. परत बाजूच्या राज्याचे आक्रमण होणार की काय?

प्रधानजी : शेजारील कल्याणपूर राज्यातील बातमी आहे महाराज. तिथे कल्याणचंद महाराज पाच वर्षांकरता निवडून आले आहेत. तिथे निवडणूक नावाची प्रथा नव्याने आलेली आहे, म्हणजे कल्याणचंद महाराजांनीच आणली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार दर पाच वर्षांनी प्रजा त्यांना निवडेल. त्यांच्याबद्दल

मत देईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. यास तिथे निवडणूक म्हणतात. यानंतर आजूबाजूच्या काही राज्यांकडूनही अशी निवडणूक व्हावी अशी मागणी होत आहे. काही ठिकाणी यास लोकशाही म्हणण्यात येते.

महाराज : लोकशाही? राज्य चालवण्याशी लोकांचा काय संबंध? राज्य चालवणे ही आमची जबाबदारी आहे त्यात लोकांचा हस्तक्षेप? कल्याणचंदांचे डोके फिरले आहे काय?

महाराजांना यातील धोका लगेच कळतो.

महाराज : या सर्व बातम्या जनतेपर्यंत जाऊ देऊ नका. त्यांची मने यातून कलुषित होण्याची शक्यता आहे.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. कल्याणचंदाच्या राज्यात व्यक्ती स्वातंत्र्य नि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अशा पण काही गोष्टींबद्दल चर्चा सुरू असल्याचे कळते महाराज.

बाकी महाराज कसेही असले तरीही याबाबतीत ते लगेच सतर्क होतात.

महाराज : बस्स करावे प्रधांजी. आम्हाला वाटते की परराज्यापेक्षा या गोष्टींचा धोका आपल्या राज्यास अधिक आहे. आज ह्या बातमीने आम्ही अत्यंत अस्वस्थ आहोत. आमची तब्येत आज परत बिघडली आहे. आम्हाला कोणासही तोफेतोंडी द्यायचा हुकूम देता आलेला नाही, आमचा हुकूम आहे की आपल्या मनास येईल त्या माणसास पकडून त्यास तोफेतोंडी द्या.

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

महाराज : आणि दरबार आता बरखास्त करीत आहोत आम्ही.

सर्व दरबारी : जहांपनाह, आलमगीर, शहेनशाह लोकहृदयसम्राट राजाधिराज चक्रवर्ती चक्रमादित्य महाराज की जय.



**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई येथे छातीरोग तज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने आणि त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत.

डॉक्टरांचे नेहमी दिवाळी अंकातून विनोदी कथा प्रकाशित होत असतात. पण प्रकाशित होणारे हे पहिलेच पुस्तक.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो ,सहजासहजी फ़ुकट काहीच मिळत नाही. न आरोग्य न धन न संपदा. काहीही मिळवायचं तर संघर्ष आणि श्रम करावेच लागतात. “गोलमाल” करून , मेकओव्हर सर्व काही मिळवता येतं असा गैरसमज माध्यमांद्वारे सर्वत्र पसरवला जात आहे. झटपट श्रीमंती, आठ दिवसांत गोरेपणा, महिन्याभरात लांबसडक केस, एक हनुमान यंत्र गळयात बाधले की आजारांपासून मुक्ती अशा जाहिराती माथी मारल्या जात आहेत. अशा वेळी अर्थपूर्ण पुस्तकं वाचून माणूस “जमिनीवर” येतो. फ़ुकट काहीच मिळत नसतं. प्रत्येक गोष्टीसाठी कुणाला न कुणाला कष्ट पडतात. कधी आपल्याला, कधी आपल्या आईवडलांना, गुरूंना, तर कधी समाजातील इतरांना.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं विनामूल्य मिळतात. पण ती लिहिण्यासाठी लेखकांचे कष्ट व बुद्धी लागलेले असतात. आणि या एकेका पुस्तकाची किंमत म्हणुन लेखक हजारो लाखो रुपये मिळवू शकतात. पण मराठी वाचकांना विनामूल्य पुस्तकं मिळावी, व मराठीत वाचन संस्कृती वाढावी म्हणून असंख्य लोक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांत ई साहित्य प्रतिष्ठान व हे सर्व लेखक सहभागी आहेत. आपण या अभियानात सहभागी झालात का?

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

आपल्या ओळखीच्या दहा मराठी लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहावाचनाची !वीस ई मेल आयडी देणारच ना- आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना तीन कामं : एक दम :.

संपर्क साधा :esahity@gmail. com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास

दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www. esahity. com या वेबसाईटला भेट द्या.

**आपल्या पत्राची वाट पहात आहोत.**

**धन्यवाद**

**आपले नम्र**

**टीम ई साहित्य प्रतिष्ठा**

